


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

समर्थ
# गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026
शनिवार, दि. १७ जानेवारी २०२६




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०८० | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com




# अहिल्यानगर महापालिकेतील ऐतिहासिक विजय

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडून पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे दूरध्वनीवरून अभिनंदन – भाजप-युतीची विजयाची 'हॅट्रिक'

**अहील्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहील्यानगर महापालिका निवडणुकीत मिळालेल्या ऐतिहासिक विजयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दूरध्वनीवरून पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांचे विशेष अभिनंदन केले असून,विधानसभा, नगरपरीषद आणि महानगरपालिका निवडणुकीत मिळालेले यश हे भाजपा युतीने केलेली विजयाची हॅट्रीक असल्याची असल्याची प्रतिक्रीया मंत्री ना.विखे पाटील यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केली.



विधानसभा नगरपरीषद आणि महापालिका निवडणुकीत मिळालेला विजय विश्वनेते पंतप्रधान नरेंद्र मोदी केंद्रीय मंत्री अमित शाह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अहील्यानगरच्या जनतेला समर्पित करीत असल्याचे त्यांनी याप्रसंगी आ.संग्राम जगताप डॉ सुजय विखे भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग शहराचे अध्यक्ष अनिल मोहीते विनायक देशमुख सुनिल रामदासी उपस्थित होते.

शहरातील आशीवार्द बंगल्यावर मंत्री विखे पाटील यांनी नवनिर्वाचित नगरसेवक युतीच्या कार्यकर्त्यासमवेत जल्लोष साजरा केला.भगव्या गुलालाची उधळण करून ऐतिहासिक विजयाचा आनंद साजरा करताना मंत्री विखे पाटील यांनीही घोषणा देवून युतीच्या कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवला.

पत्रकार परिषद सुरू असतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्री विखे पाटील आ.संग्राम जगताप आणि डॉ सुजय विखे पाटील यांचे विजयाबद्दल अभिनंदन केले.

आ.संग्राम जगताप आणि डॉ सुजय विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली ही निवडणुक लढवण्यात आली.विकासाची एक भूमिका घेवून आम्ही जनतेसमोर गेलो होतो.जनतेने भाजपा राष्ट्रवादी युतीला मोठे समर्थन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अहील्यानगरच्या सभेतच विजयाची हॅट्रीक पूर्ण करण्याचा दिलेला शब्द आजच्या विजयाने पूर्ण केल्याची भावना मंत्री विखे पाटील यांनी बोलून दाखवली.

राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाला मोठे यश पाहाता राज्यातील जनतेन त्यांच्या नेतृत्वाला मोठे समर्थन दिल्याचे स्पष्ट झाले.मुंबई पुणे महापालिका प्रमाणेच अन्य शहरामध्ये महायुती सरकारच्या माध्यमातून सुरू असलेल्या विकासात्मक बदलाला लोकांनी स्विकारले हेच या निकालाने दाखवून दिले असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

ठाकरे बंधूच्या एकत्र येण्याने कोणताही फरक पडणार नाही हे निवडणुकीपुर्वीच मी सांगितले होते तेच निकालातून स्पष्ट झाले.झोपेतून जागे व्हायचे आणि निवडणुकीला जायचे हे दिवस आता संपले आहेत.

## थोडक्यात...

### संजय राऊतांची 'वेट अँड वॉच'ची भाषा

**मुंबई (समर्थ गांवकरी) :** राज्यातील 29 महापालिका निवडणुकांचे निकाल समोर येत आहेत. मुंबईत भाजप आणि शिवसेना युती आघाडीवर असल्याचे दिसून येत आहे. शिवसेना ठाकरे गट आणि मनसेचे देखील बऱ्यापैकी जागा येताना दिसत आहेत. एकूणच येथील निवडणूक ही अटीतटीची दिसून येत आहे. यावर ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. संजय राऊत म्हणाले, दुपारी 3 नंतर जे निकाल यायला सुरुवात झाली त्यातले 80-85 टक्के निकाल हे शिवसेनेच्या विजयाच्या आहेत. आम्ही अनेक ठिकाणी आघाडीवर आहोत. नक्कीच अटीतटीची लढत आहे. काटे की टक्कर आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सुद्धा उमेदवार विजयी होत आहेत. त्यांचाही आकडा वाढत आहे. अशा वेळेला तुम्ही आव्हाणांची भाषा करत आहात. मुंबईची लढाई इतर महापालिकांपेक्षा वेगळी आहे, इथली लढाई आम्ही शेवटच्या श्वासापर्यंत लढणार. अजून लढाई संपली नाही. पूर्ण निकाल हाती आल्यानंतर मग आपण बोलू.

### प्रतिष्ठा वाचवली

**लातूर (समर्थ गांवकरी) :** मुंबईसह महाराष्ट्रातील 29 महानगरपालिकांच्या निवडणुकीचे निकाल जाहीर होत असताना काँग्रेससाठी दिलासादायक बातमी लातूरमधून समोर आली आहे. राज्यभरात अनेक ठिकाणी काँग्रेसला धक्के बसत असताना लातूर महानगरपालिकेने काँग्रेसची राजकीय लाज वाचवली असल्याचं चित्र आहे. 70 जागांच्या लातूर महानगरपालिकेत काँग्रेसने स्वबळावर 47 जागा जिंकत स्पष्ट वर्चस्व प्रस्थापित केलं आहे. याउलट भाजपला 22 मिळाल्या आहेत. तर अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला केवळ एका जागेवर समाधान मानावं लागलं. लातूर हा काँग्रेसचा पारंपरिक बालेकिल्ला मानला जातो आणि या निवडणुकीत तो पुन्हा एकदा अधोरेखित झाला. विशेष म्हणजे ही दुसरी महानगरपालिका ठरली आहे जिथे काँग्रेसने भाजपला थेट पराभूत केलं आहे. यापूर्वी चंद्रपूर महानगरपालिकेत काँग्रेसने विजय मिळवत भाजपसमोर कडवं आव्हान उभं केलं होतं.

# महानगरपालिका निवडणुकीत महायुतीचा झंझावात

■ पारनेरमध्ये भाजपचा फटाके वाजवून जल्लोष!

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**



महाराष्ट्र राज्य महानगरपालिका निवडणुकीत महायुतीने मिळवलेल्या ऐतिहासिक आणि प्रचंड विजयाचे पडसाद आज पारनेरमध्ये उमटले. पारनेर तालुका भारतीय जनता पक्षाच्या वतीने या विजयाचा आनंद मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शहरातील मुख्य चौकात फटाक्यांची प्रचंड आतषबाजी आणि एकमेकांना पेढे भरवून कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. यावेळी भाजप कार्यकर्त्यांनी 'भारतीय जनता पक्ष विजय असो', 'महायुतीचा विजय असो' अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला होता. राज्यामध्ये विकासाच्या मुद्द्यावर जनतेने महायुतीला दिलेला हा कौल असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. या अभूतपूर्व विजयाबद्दल पारनेर भाजपच्या वतीने राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री मा. नामदार देवेंद्रजी फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, विजय चौधरी साहेब, रविजी अनासपुरे, जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि माजी खासदार सुजय दादा विखे पाटील यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले. या नेत्यांच्या सक्षम नेतृत्वाखाली आणि नियोजनामुळेच महायुतीला हे यश संपादन करता आले, अशी भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. या प्रसंगी बोलताना भाजप राज्य परिषद सदस्य विश्वनाथ दादा कोरडे म्हणाले की, "राज्यातील जनतेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वावर आणि महायुती सरकारच्या लोककल्याणकारी योजनांवर विश्वास दाखवला आहे. जलसंपदामंत्री राधाकृष्णजी विखे पाटील साहेब आणि सुजय दादा यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यासह राज्यात भाजपने आपली ताकद सिद्ध केली आहे. हा विजय आगामी निवडणुकांसाठी कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह भरणारा ठरेल." या जल्लोष कार्यक्रमाला मंडल अध्यक्ष राहुल शिंदे पाटील, मा.जि.प. वसंतराव चेडे, नगरसेवक अशोक चेडे, नगरसेवक युवराज पठारे, सुनील म्हस्के, लहू भालेकर, कल्याण थोरात, सखाराम औटी, अर्जुन नवले, कानिफनाथ ठुबे, रमेश गाडगे, संतोष सातपुते, कांतिलाल बोरुडे, मनोज गंधाडे, राजेश चव्हाण, बाबू ठुबे, सुजित मुळे, पारनेर तालुक्यातील भाजपचे सर्व प्रमुख पदाधिकारी, विविध आघाड्यांचे अध्यक्ष, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बीडकरांनी काढला पराभवाचा वचपा, धंगेकरांच्या मुलासह पत्नीचा पराभव

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

राज्यातील 29 महापालिका निवडणुकांच्या निकालाचे अंतिम कल हाती आले आहेत. बहुतांश जिल्ह्यात भाजप पुन्हा एकदा मोठा पक्ष ठरल्याचे दिसून आलं आहे. पुण्यात देखील भाजपची सत्ता आली आहे. त्यामुळं भाजपचा महापौर होणार हे जवळफास निश्चित झालं आहे. दरम्यान, पुण्यात गणेश बीडकरु विरुद्ध माजी आमदार रवींद्र धंगेकर यांचे पुत्र प्रणव धंगेकर यांच्या लढतीकडे सर्वाचं लक्ष लाहलं होतं. यामध्ये अखेर गणेश बीडकर यांनी बाजी मारली आहे. बीडकरांनी 2017 च्या रवींद्र धंगेकर यांनी केलेल्या पराभवाचा वचपा काढला आहे. गणेश बीडतक हे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू सहकारी मानले जातात.

रवींद्र धंगेकरांचा मुलगा प्रणव आणि रवींद्र धंगेकरांच्या पत्नी प्रतिभा यांचा पराभव झाला आहे. पत्नीचा प्रभाग क्रमांक 23 मधुन पराभव तर मुलगा प्रणवचा प्रभाग क्रमांक 24 मधुन पराभव झाला आहे. भाजप आणि शिंदे सेनेची युती न झाल्याने प्रभाग क्रमांक 23 आणि 24 मध्ये धंगेकरांचा सामना भाजपच्या उमेदवारांसोबत झाला होता. प्रणव धंगेकरची लढत भाजपचे गटनेते गणेश बिडकर यांच्या विरुद्ध झाली. 2017 मधील नगरसेवकपदाच्या निवडणुकीत रविंद्र धंगेकरांनी गणेश बिडकरांचा पराभव केला होता. यावेळी गणेश बिडकरांच्या समोर रविंद्र धंगेकरांचा मुलगा प्रणवचे आव्हान होते. अखेर बीडकरांनी बाजी मारली आहे.

# मुंबई हातातून निसटली पण ठाकरेंच्या शिवसेनेचा परभणीत विजयाचा झेंडा

**परभणी : (समर्थ गांवकरी)**

परभणी महानगरपालिकेत ठाकरेंच्या शिलेदारांनी भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेचा वारु रोखला आहे. परभणी महानगरपालिकेत ठाकरेंच्या शिवसेनेनं 25 जागांवर विजय मिळवला. आमदार राहुल पाटील यांनी गेल्या 10 वर्षात केलेल्या कामाची पावती असल्याचं म्हटलं. आम्ही 30 जागा जिंकणार होतो, मात्र शेवटच्या दोन दिवसात पैशांचा वापर झाल्यानं आमची संख्या कमी झाली, असं राहुल पाटील म्हणाले. परभणीत ठाकरेंची शिवसेना काँग्रेसच्या सहकार्यानं महापौर पदी शिवसैनिक बसवू शकते.

सर्व धर्मातील लोकांनी आम्हाला मतदान केलं आहे. प्रभाग क्रमांक 15 मध्ये आम्हाला 2 जागांवर विजय मिळाला आहे. प्रभाग क्रमांक 9 मध्ये आमची जागा विजयी झाली आहे. प्रभाग क्रमांक 1 मध्ये आमची जागा विजयी झालेली आहे. आम्ही 25 जागांवर विजय झाला आहे. पैशांचा वापर झाला नसता तर आम्ही 30 जागा जिंकलो असतो, असं राहुल पाटील म्हणाले.

राहुल पाटील पुढं म्हणाले की पैसे वाटप संपूर्ण महाराष्ट्रात झालेलं आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री पक्षाचा प्रचार म्हणून येतातच. मात्र, इथं विकास कोण करु शकतो, कोणाचं कार्यकर्त्यांचं जाळ आहे. दवाखाना, पोलीस स्टेशन असेल आमचे कार्यकर्ते धावून जातात. आमचे शिवसैनिक मदत करत असतात. त्यामुळं मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री येऊन त्याचा फरक पडला नाही. विकास निधीसंदर्भात यापूर्वी देखील अडचण निर्माण झाली होती, मात्र आम्ही सक्षम आहोत. शेवटी जनता आमच्याबरोबर आहे, समांतर पाणी पुरवठा योजना असेल जनता आमच्यासोबत आहे. परभणी शहर चहूबाजूंनी वाढत आहे.




# अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून १०० कोटींचे सोनेतारण कर्ज वितरण सुरू!

### ग्रामीण भागातील शेतकरी, व्यापारी व सर्वसामान्यांना मोठा दिलासा






**डॉ. विश्वासराव आरोटे**
कळसुबाई शिखरावरून

**(समर्थ गांवकरी)**

"तुमची नड, आमची सोडवणूक" हा ध्यास आणि "कमी कागदपत्रे, तातडीची सेवा" ही अनेक वर्षांची विश्वासार्ह परंपरा जपत अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांनी जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागासाठी १०० कोटी रुपयांच्या सोनेतारण कर्ज वितरणाचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला सुरू झालेल्या या महत्त्वपूर्ण उपक्रमामुळे शेतकरी, व्यापारी, कामगार, महिला, लघुउद्योजक तसेच सर्वसामान्य कुटुंबांना आर्थिक दिलासा मिळाला आहे.

राज्यातच नव्हे तर आशिया खंडात बळीराजाला सातत्याने आर्थिक पाठबळ देणारी अग्रगण्य सहकारी बँक म्हणून ओळख असलेल्या जिल्हा बँकेने "जिल्हा बँक आपल्या दारी" ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवली आहे. या अंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातील १४ तालुक्यांमधील २९१ शाखांमधून एकाचवेळी सोनेतारण कर्ज सुविधा सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे कर्जासाठी तालुक्याच्या ठिकाणी किंवा दूरच्या शाखांमध्ये फेऱ्या मारण्याची गरज संपुष्टात आली असून, आपल्या गावात, आपल्या परिसरातच कर्ज उपलब्ध झाले आहे.

या निर्णयामागे बँकेचे चेअरमन चंद्रशेखर घुले पाटील, व्हॉइस चेअरमन माधवराव कानडे, कार्यकारी संचालक रावसाहेब वर्पे तसेच संपूर्ण संचालक मंडळाचा दूरदृष्टीपूर्ण विचार आणि ग्राहकहितैषी धोरण आहे. नवीन वर्षाच्या प्रारंभापूर्वीच सर्वसामान्यांच्या दीर्घकालीन मागणीची पूर्तता करत बँकेने हा निर्णय घेतल्याने सहकार चळवळीवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे.

आजपर्यंत ग्रामीण भागात सावकारशाही, जास्त व्याजदर, अटी-शर्ती, अविश्वसनीय व्यवहार आणि कागदपत्रांचा जाच यामुळे अनेकांचे कंबरडे मोडले होते. "शब्दावर व्यवहार" ही परंपरा असली तरी अनेक वेळा नागरिकांची फसवणूकही झाली. मात्र आता पारदर्शक, सुरक्षित व कायदेशीर सोनेतारण कर्ज जिल्हा बँकेमार्फत उपलब्ध झाल्याने सावकारांच्या दारात जाण्याची वेळ राहिलेली नाही. कमी कागदपत्रे, जलद प्रक्रिया आणि वाजवी व्याजदर ही या योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

शेतीसाठी बियाणे, खत, औषधे, सिंचन व्यवस्था, तसेच घरगुती गरजा, शिक्षण, वैद्यकीय उपचार, लघुउद्योग, व्यापार विस्तार यासाठी नागरिकांना तातडीच्या निधीची आवश्यकता असते. या सर्व गरजा लक्षात घेऊन जिल्हा बँकेने सोनेतारण कर्ज योजना प्रभावीपणे राबवली आहे. त्यामुळे "क्षणात गरज, तत्काळ कर्ज" हे समीकरण प्रत्यक्षात साकार होत आहे.

"विना सहकार नाही उद्धार" या ब्रीदवाक्याप्रमाणे जिल्हा बँक आता केवळ आर्थिक व्यवहारापुरती मर्यादित न राहता, प्रत्येक नागरिकाच्या सुख-दुःखात सहभागी होत असल्याचे चित्र आहे. सहकाराच्या माध्यमातून आर्थिक समृद्धी साधण्याचा बँकेचा प्रयत्न या योजनेतून स्पष्टपणे दिसून येतो.

या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील शेतकरी, व्यापारी व सर्वसामान्य नागरिकांनी आपल्या पंचक्रोशीत, तालुक्यातील महत्त्वाच्या ठिकाणी असलेल्या जिल्हा बँकेच्या शाखेशी संपर्क साधून सोनेतारण कर्ज सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन बँक प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

"सावकार नको, पतसंस्था नको – आपली मातृसंस्था जिल्हा बँकच" ही भावना आता नागरिकांच्या मनात खोलवर रुजत असून, या निर्णयामुळे जिल्ह्यातील आर्थिक व्यवहारांना नवे बळ मिळाले आहे.

# नागपूर-भंडाऱ्यानंतर ईडीची नजर चंद्रपूरकडे?

■ "अती तिथे माती नव्हे, अती तिथे रेती!" – रेतीमाफियांचे जाळे उघडकीस येण्याची शक्यता!

(समर्थ गांवकरी)



नागपूर आणि भंडारा जिल्ह्यानंतर आता चंद्रपूर जिल्ह्यावर अंमलबजावणी संचालनालयाची (Enforcement Directorate) नजर वळण्याची चर्चा जोर धरू लागली आहे. राज्यातील रेती धोरण, त्यानंतर घडलेले घटनाक्रम आणि अलीकडेच नागपूर आणि भंडारा येथे झालेल्या ईडी कारवायांमुळे चंद्रपूर जिल्ह्यातील रेती व्यवहारांवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

पूर्वी "अती तिथे माती" ही म्हण प्रचलित होती; मात्र आजच्या वास्तवात ती बदलून "अती तिथे रेती" अशी नवी म्हण रूढ होत असल्याचे चित्र दिसते. गौण खनिज असलेल्या रेतीतून शासनाला महसूल मिळावा म्हणून रेतीघाटांचे लिलाव करण्यात आले. कोट्यवधींचे लिलाव झाले; पण प्रत्यक्षात मात्र रेतीचोरी, माफियांचे टोळीयुद्ध, पर्यावरणाची हानी आणि शासनाच्या तिजोरीला बसलेला फटका हे वास्तव समोर आले.

रेतीचोरीचे अर्थकारण आणि वाढती अराजकता : "रेतीचे कण रगडता तेल गळे" म्हणणाऱ्या लोकांनी आता "रेतीचे कण रगडता पैसा गळतो" असा अर्थ शोधून काढला आहे. नद्या-नाले लुटून रेतीमाफियांनी वारेमाप पैसा जमविला. राज्यात रेतीचोरीतून हत्या, टोळीयुद्ध आणि धमक्यांचे सत्र सुरू झाले. शहाणे उपाशी, रेतीचोर तुपाशी, अशी चर्चा गल्लीपासून दिल्लीपर्यंत सुरू आहे.

राजकारणात रेतीचा शिरकाव : रेतीचोरीचा पैसा राजकारणात शिरल्याचा आरोप आता उघडपणे होत आहे. "याची अडवा, त्याची जिरवा" हे धोरण रेतीचोरीतून पुढे आले, अशी टीका होत आहे. सर्वसामान्य नागरिकांना घरबांधणीसाठी रेती मिळत नाही; तर माफियांच्या वाहनांतून टी.पी., रॉयल्टीच्या 'डिमांड'वर खुलेआम वाहतूक सुरू असल्याचे आरोप आहेत.

विधानसभेत तंबी, आरोपांची चर्चा : हिवाळी अधिवेशनात राज्याचे दबंग नेते, माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत रेती माफियांवर कडक शब्दांत तंबी दिली होती. लोकसभेतील पराभवासाठीही रेतीमाफियांना जबाबदार धरल्याचा त्यांचा आरोप खळबळजनक ठरला. या आरोपांमधून स्वपक्षातीलच एका आमदाराकडे बोट दाखवले गेले, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली.

एकेकाळी चंद्रपूर जिल्ह्यात ५८ रेतीघाट होते. स्वतंत्र लिलावांतून स्थानिक ठेकेदारांचा कब्जा वाढला आणि याच प्रक्रियेतून रेतीचोर, तस्कर व माफिया तयार झाल्याचे आरोप आहेत. महसूल, पोलीस, वाहतूक पोलीस, आरटीओ, हे विभाग 'रक्षक' असतानाच 'संरक्षक' बनल्याचा गंभीर आरोप केला जातो. परिणामी पर्यावरणाचा ऱ्हास, शासनाचा महसूल बुडाला; तर माफिया आणि हातमिळवणी करणाऱ्यांची कमाई वाढली.

चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा येथील रेती विदर्भात व विदर्भाबाहेर मोठ्या प्रमाणात पाठवली जाते. लिलाव किती, प्रत्यक्ष उपसा किती—हे गणित समोर असूनही संबंधित विभागांनी "डोळ्यात रेती" गेलेली असल्याची टीका होते.

यंदा चंद्रपूर जिल्ह्यातील रेतीघाट एकत्रितपणे सत्ताधारी पक्षातील प्रभावी मंत्र्याच्या 'प्याद्याला' दिल्याची चर्चा आहे. तर ब्रह्मपुरी, मूल, सावली तालुक्यांतील काही घाट विरोधी पक्षाशी संबंधित ठेकेदार-माफियाला मिळाल्याची कुजबुज आहे. नगरपालिकांपासून पंचायत समितीपर्यंतच्या निवडणुकांत रेतीमाफियांचा पैसा खुलेआम उधळल्याचे चित्र दिसले. अनेकांनी पत्नी-पुत्रांना पुढे करून राजकारणात पाय रोवण्याचा प्रयत्न केल्याचेही बोलले जाते.

नागपूर आणि भंडाऱ्यात ईडीने रेतीचोर नेत्यांची लबाडी उघड केल्यानंतर आता चंद्रपूरकडे लक्ष वळल्यास, गेल्या पंधरा वर्षांत किती रेती 'सुतली' याचा हिशेब उघड होईल, अशी अपेक्षा व्यक्त होते. तसे झाले तर "अती तिथे माती नव्हे, अती तिथे रेती" या नव्या म्हणीवर अधिकृत शिक्कामोर्तब होईल, असे जाणकार सांगतात.

### रेती धोरण—माफियांसाठी की जनतेसाठी?

रेती धोरण जाहीर झाले; पण घरबांधणीसाठी सर्वसामान्यांना रेती मिळत नसल्याची तक्रार कायम आहे. उलट माफियांचे 'डिमांड' आणि खुलेआम चोरी सुरूच आहे. त्यामुळे रेती धोरण हे माफियांसाठी की जनतेसाठी, हा प्रश्न अधिक तीव्र होत आहे. चंद्रपूर जिल्ह्यात ईडीची कारवाई झाली, तर केवळ आरोप नव्हे तर वास्तव समोर येईल आणि राज्यात रेतीमाफियांच्या गोरखधंद्याचा खरा चेहरा उघडा पडेल, अशी चर्चा सध्या सर्वदूर सुरू आहे.

## ह.भ.प. ज्ञानेश्वरजी महाराज तांबे यांच्या कीर्तनातून जीवनमूल्यांचा संदेश




श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)

श्रीगोंदा तालुक्यातील हिरडगाव येथील महादजी शिंदे विद्यालयाचे प्राचार्य श्री. दिलीप भुजबळ यांच्या मातोश्री कै. जाईबाई दगडू भुजबळ यांच्या प्रथम पुण्यस्मरण कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत श्रद्धाभावाने करण्यात आले होते. यावेळी दिवंगत आत्म्यास भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली तसेच भुजबळ कुटुंबीयांप्रती उपस्थितांनी मनःपूर्वक संवेदना व्यक्त केल्या. या प्रसंगी ह.भ.प. ज्ञानेश्वरजी महाराज तांबे (नेवासेकर) यांच्या सुश्राव्य कीर्तन सेवेचा उपस्थितांना लाभ झाला. त्यांच्या कीर्तनातून जीवनमूल्ये, श्रद्धा, संयम व आत्मिक बळ यांचे महत्त्व प्रभावीपणे अधोरेखित करण्यात आले. कीर्तनामुळे उपस्थितांच्या मनात सकारात्मक ऊर्जा निर्माण होऊन वैचारिक प्रबोधन झाले.

ईश्वर दिवंगत आत्म्यास सद्गती देवो व भुजबळ कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याचे बळ देवो, अशी सामूहिक प्रार्थना यावेळी करण्यात आली. या कार्यक्रमास माजी मंत्री मा. बबनराव पाचपुते, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बाबासाहेब भोस, राजेंद्रआबा म्हस्के, घोडेगावचे सरपंच रामदास घोडके, महाराजा जिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य महादेव जरे, उत्तर विभागीय इन्स्पेक्टर नवनाथ बोडखे, नागवडे कारखान्याचे संचालक प्रशांत दरेकर, श्रीगोंदा नगर परिषदेच्या उपनगराध्यक्षा अलकाताई अनभुले, नगरसेवक राजेंद्र खेडकर, रयत सेवक, भुजबळ कुटुंबीयांचे नातेवाईक, मित्रपरिवार व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाविद्यालयात 'जिमखाना डे' उत्साहात साजरा

श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)




छत्रपती शिवाजी महाविद्यालयात शुक्रवार, दि. १६ जानेवारी २०२६ रोजी 'जिमखाना डे' कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी यांनी केले. त्यांनी लोकनेते स्व. शिवाजीराव (बापू) नागवडे यांच्या कार्याचा गौरव करत, मा. राजेंद्रदादा नागवडे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालय सातत्याने प्रगती करत असल्याचे सांगितले. तसेच अनुराधाताई नागवडे यांच्या मार्गदर्शनातून मुलींच्या वस्तीगृहासह महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी विविध सोयीसुविधा उपलब्ध होत असल्याचे नमूद केले.

स्व. शिवाजीराव (बापू) नागवडे यांच्या प्रयत्नांतून महाविद्यालयाची उभारणी होऊन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे. विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकासासोबतच शारीरिक विकास घडविण्यावर महाविद्यालय विशेष भर देत आहे. खेळामुळे विजय-पराजय स्वीकारण्याची मानसिकता विकसित होते. शारीरिक व्यायामामुळेच ज्ञान अधिक सुदृढ होते, तसेच अपयश व खडतर प्रवासातूनच यशाचा मार्ग तयार होतो, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. सुदामजी शेळके (क्रीडा संचालक, पुणे विद्यापीठ / शिवछत्रपती पुरस्कार विजेते) उपस्थित होते. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी सांगितले की, खेळाडू घडण्यासाठी सातत्य अत्यंत महत्त्वाचे असते. आयुष्यात घडणाऱ्या घटनाच विद्यार्थ्यांना योग्य दिशा दाखवतात. महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील यशस्वी वाटचालीचा त्यांनी गौरव केला. ग्रामीण भागातील विद्यार्थी प्रशासकीय सेवांमध्ये यश संपादन करत असून, विद्यार्थ्यांना स्वयंपूर्ण बनविण्यासाठी महाविद्यालय मोलाचे कार्य करत असल्याचे त्यांनी नमूद केले. अभ्यासासोबत सातत्यपूर्ण प्रयत्न केल्यास विद्यार्थी निश्चितच यशस्वी होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सावताजी हिरवे होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी स्व. शिवाजीराव (बापू) नागवडे यांनी सहकार, शिक्षण व शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या कार्याचे महत्त्व अधोरेखित केले.

या प्रसंगी विद्यार्थ्यांना विविध क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांतील यशाबद्दल बक्षीस वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या उल्लेखनीय कामगिरीचा गौरव करत त्यांना स्मृतिचिन्हे व प्रमाणपत्रे देण्यात आली. याशिवाय सलाड मेकिंग, रांगोळी, मेहंदी, पाककला स्पर्धा तसेच 'आनंदी बाजार' आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थांची विक्री केली. सर्व स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साह व आनंदाचे वातावरण दिसून आले.

या कार्यक्रमास दत्तात्रय काकडे, प्रविण लबडे, मंदाकिनी पाचपुते, रवींद्र पाचपुते, प्रशांत राऊत, प्रियांका नागवडे, रुपाली गायकवाड, सोनाली जामदार, सविता लगड, पूनम फिरोदिया, प्रा. प्रविण टकले, प्रा. चंद्रभान कातोरे, प्रा. नंदकुमार पवार, डॉ. मिलिंद बेडसे, डॉ. सतीश चोरमले, प्रा. सुनील माने तसेच प्राध्यापक-प्राध्यापिका व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शंकर गवते यांनी केले तर आभारप्रदर्शन डॉ. महेश गिरमकर यांनी केले.

## शालेय विद्यार्थ्यांनी वाहतुकीच्या नियमांचे काटेकोर पालन करावे

श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)




शालेय विद्यार्थ्यांनी शाळेत ये-जा करताना वाहतुकीचे नियम तंतोतंत पाळावेत. अठरा वर्षांखालील मुलांनी दुचाकी अथवा चारचाकी वाहने चालवू नयेत. कायद्याचे उल्लंघन केल्यास दंडात्मक कारवाईसह शिक्षेचीही तरतूद आहे, असे स्पष्ट प्रतिपादन अहिल्यानगरचे प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) सुनील मेरुकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना केले.

श्रीगोंदा तालुक्यातील लोणी व्यंकनाथ येथील श्री व्यंकनाथ विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयास आरटीओ सुनील मेरुकर यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद साधत वाहतुकीचे नियम, अटी तसेच नियमभंगाचे दुष्परिणाम याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

मार्गदर्शन करताना आरटीओ मेरुकर म्हणाले की, ग्रामीण भागातील अनेक शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी विनापरवाना दुचाकी व चारचाकी वाहने चालवत असल्याचे निदर्शनास येत आहे. हे कृत्य कायद्याने गंभीर गुन्हा आहे. सध्या काही विद्यार्थी बेफिकिरीने रस्त्यावर वाहने चालवत असून, वयाची अट पूर्ण न करता शाळा व महाविद्यालयात वाहने घेऊन येणे कायदेशीर नाही. अशा प्रकारामुळे गंभीर अपघात घडल्यास संबंधित विद्यार्थी व त्याच्या पालकांनाही पाच हजार रुपयांपर्यंत दंड तसेच कायदेशीर शिक्षेची तरतूद आहे. दंड व शिक्षा टाळण्यासाठी अठरा वर्षांपूर्वी कोणतेही वाहन चालवू नये, असे आवाहन त्यांनी केले. तसेच शाळेत येताना व शाळा सुटल्यानंतर रस्त्याच्या योग्य बाजूनेच चालावे, याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी प्राचार्य बाळासाहेब जठार यांनी आरटीओ सुनील मेरुकर यांचे स्वागत करताना ते व्यंकनाथ विद्यालयाचे माजी विद्यार्थी असल्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. याच विद्यालयातून शिक्षण घेऊन विद्यार्थी उच्च पदावर पोहोचल्याने विद्यालय व गावाचा नावलौकिक वाढला असून, याचा अभिमान असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच शालेय विद्यार्थ्यांनी पात्र नसताना वाहने चालवू नयेत, कारण त्याचे गंभीर परिणाम विद्यार्थ्यांबरोबरच पालकांनाही भोगावे लागतात, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमादरम्यान शालेय विद्यार्थ्यांनी "रस्त्याच्या कडेने चालायचं गड्या" हे गीत सादर करून वाहतूक नियमांविषयी जनजागृती केली.

या कार्यक्रमास नागवडे कारखान्याचे माजी संचालक विलासराव काकडे, स्कूल कमिटी सदस्य पुरुषोत्तम लगड, मधुकर पवार, प्राचार्य बाळासाहेब जठार, मुख्याध्यापक शिवाजीराव गवळी, मुख्याध्यापक अनिल जाधव, पत्रकार नंदकुमार कुरुमकर यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## सुनिता फुलसौंदर यांना सर्वाधिक मते

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

प्रथम महापौर भगवान फुलसौंदर यांच्या पत्नी सुनीता फुलसौंदर (राष्ट्रवादी) प्रभाग क्रमांक १४ ब मधून विजयी झाल्या आहेत. फुलसौंदर यांना ९ हजार ८८६ मते मिळवित सर्वात जास्त मतानी विजय संपादन केला. त्यांच्या विरोधी अपक्ष उमेदवार सुरेखा घरवाढवे यांना अवघे ५३१ मते मिळाली. फुल सौंदर यांना ९ हजार ३५५ मताच्या फरकाने विजयी झाल्या.




अहील्यानगर महापालिकेत मिळालेल्या ऐतिहासिक विजयाबद्दल मुंबई येथे भाजपा प्रदेश कार्यालयात मुख्यमंत्री मा.देवेंद्र फडणवीस यांनी पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांना पेढा भरवून अभिनंदन केले.

# डॉ. सुधीर भास्करराव तांबे पाटील यांचा ७२ वा वर्धापनदिन

## नाशिक पदवीधर मतदारसंघात हॅटट्रीक विजय आणि सामाजिक कार्याचा गौरव!

(समर्थ गांवकरी)



**डॉ. विश्वासराव आरोटे**
कळसुबाई शिखरावरून

आज महाराष्ट्रातील राजकारणातील प्रभावी व्यक्तिमत्व, माजी विधानपरिषदेचे सदस्य आणि समाजसेवेतील अग्रणी कार्यकर्ते डॉ. सुधीर भास्करराव तांबे पाटील यांचा ७२ वा वाढदिवस उत्साहाने साजरा होत आहे. डॉ. तांबे हे केवळ राजकारणी नाहीत, तर वैद्यकीय तज्ज्ञ, समाजसुधारक आणि शैक्षणिक क्षेत्रातील पुढारी व्यक्तिमत्व देखील आहेत.

राजकीय कार्यकुशलता आणि नाशिक पदवीधर मतदारसंघातील हॅटट्रीक विजय:

डॉ. तांबे यांनी नाशिक स्नातक मतदार संघातून तीन वेळा विधानपरिषदेवर आपली झळक दाखवली आहे – २००९, २०१० आणि २०१७ मध्ये. या निवडणुकीत त्यांनी काँग्रेसच्या बॅनरखाली विजयी होऊन जनतेसाठी विकासकार्याचे वचन पाळले.

निवडणुकीत त्यांनी भाजपचे उमेदवार डॉ. प्रशांत पाटील यांच्यावर ४२,८२५ मतांनी आघाडी मिळवून विजय मिळवला. डॉ. तांबे यांना ८३,३११ मते मिळाली, तर डॉ. पाटील यांना ४०,४८६ मते मिळाली. या विजयानंतर त्यांनी नाशिक पदवीधर मतदारसंघात काँग्रेसची हॅटट्रीक पूर्ण केली.

डॉ. तांबे यांच्या या यशाने दाखवून दिले की जनतेशी असलेली साखळी, प्रामाणिक कार्य आणि सेवा वृत्तीच राजकीय यशाची गुरुकिल्ली आहे.

वैद्यकीय क्षेत्रातील कार्य आणि समाजसेवा : डॉ. तांबे हे साधारण शल्य वैद्यक (General Surgeon) आहेत. त्यांनी पुण्यातील बी. जे. मेडिकल कॉलेज येथून एम.एस. (Master of Surgery) पूर्ण केले आणि वैद्यकीय क्षेत्रात आपले कौशल्य सिद्ध केले.

संगमनेर येथील अमृतवाहिनी ग्रामीण चॅरिटेबल हॉस्पिटल येथे ते मुख्य विश्वस्त (Chief Trustee) आहेत. या हॉस्पिटलच्या माध्यमातून त्यांनी ग्रामीण भागातील लोकांना मोफत किंवा किफायतशीर आरोग्यसेवा, शस्त्रक्रिया, औषधोपचार आणि तपासण्या उपलब्ध करून दिल्या आहेत.

डॉ. तांबे यांच्या नेतृत्वाखाली हॉस्पिटलने २०,००० हून अधिक रुग्णांना सेवा, शिबिरांद्वारे ५०,००० हून अधिक ग्रामीण नागरिकांपर्यंत आरोग्यसेवा पोहचवली आहे.

विशेष माहिती:
शस्त्रक्रिया: २०००+
सामाजिक आरोग्य शिबिरे: १००+
ग्रामीण रुग्ण संख्या: ५०,०००+

शैक्षणिक उपक्रम आणि समाजकल्याण : डॉ. तांबे यांनी केवळ वैद्यकीय क्षेत्रातच नाही तर शिक्षण आणि ग्रामीण विकास क्षेत्रातही मोठे योगदान दिले आहे. त्यांनी विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, शैक्षणिक संस्था, प्रशिक्षण कार्यक्रम आणि कौशल्य विकास शिबिरे सुरू केली आहेत.

यांच्या उपक्रमांमुळे हजारो तरुणांना शिक्षणासाठी वाव मिळाला आणि ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान सुधारले आहे.



कौटुंबिक जीवन : डॉ. तांबे यांचा जन्म १७ जानेवारी १९५४, संगमनेर येथे झाला. ते पत्नी दुर्गाताई तांबे यांचे सहचर आहेत. त्यांचे मुले:

सत्यजीत तांबे – २०२३ मध्ये नाशिक पदवीधर मतदारसंघातून विजयी

डॉ. हर्षल तांबे – वैद्यकीय क्षेत्रातील कार्यरत

सत्यजीत तांबे यांनी वडिलांचा राजकीय वारसा पुढे चालवण्यास सुरुवात केली आहे, ज्यामुळे तांबे कुटुंबाची राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक कार्याची परंपरा अधिक मजबूत झाली आहे.

वर्धापनदिनानिमित्त शुभेच्छा : आजच्या दिवशी राजकारण, वैद्यकीय सेवा आणि समाजकार्य क्षेत्रातील सहकारी, कार्यकर्ते आणि सामान्य नागरिक डॉ. तांबे यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देत आहेत.

डॉ. तांबे यांचे जीवन हे प्रामाणिक सेवा, जनतेची काळजी आणि ज्ञानाचे मिश्रण यांचे प्रेरणादायी उदाहरण आहे. त्यांच्या कार्यामुळे अनेक लोकांचे जीवन बदलले आहे आणि समाजातील अनेक पिढ्यांना प्रेरणा मिळाली आहे.

### ४२,८२५ मतांनी हॅटट्रीक विजय

डॉ. तांबे यांचा समाजकार्याचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहचेल, अशी सर्वांना अपेक्षा आहे.

### इन्फोग्राफिक हायलाइट्स

- राजकीय कारकीर्दीची सुरुवात संगमनेर नगराध्यक्ष पदापासून झाली.
- नाशिक पदवीधर मतदारसंघात तीन वेळा विजय (२००९, २०१०, २०१७)
- अमृतवाहिनी ग्रामीण हॉस्पिटलचे मुख्य विश्वस्त.
- सामाजिक आरोग्य शिबिरे व शिष्यवृत्ती उपक्रम.

# कुंभमेळ्यापूर्वीच शिर्डीतील विकासकामे पूर्ण करा : डॉ. प्रवीण गेडाम

- भाविकांच्या सोयी-सुविधांना सर्वोच्च प्राधान्य
- शिर्डी विमानतळ विस्तार, रस्त्यांच्या कामांना गती देण्याचे निर्देश
- कुंभमेळा पूर्वतयारी बैठक संपन्न



**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**

आगामी नाशिक - त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शिर्डीत येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी सुरू असलेली विकासकामे निर्धारित वेळेत पूर्ण होणे आवश्यक आहे. शिर्डी विमानतळ विस्तारीकरण व रस्त्यांच्या कामांचा वेग वाढवून ती कुंभमेळ्यापूर्वीच पूर्ण करावीत. तसेच, गर्दीचे नियोजन करताना प्रशासकीय सोयीपेक्षा भाविकांसाठीच्या सोयी- सुविधांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे, अशा सूचना नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा नाशिक विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी आज येथे दिल्या.

आगामी नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्याच्या (२०२६-२७) अनुषंगाने शिर्डी-शिंगणापूर येथील भाविकांच्या गर्दी नियोजनाबाबत साईबाबा मंदिर सभागृहात आयोजित आढावा बैठकीत डॉ. गेडाम बोलत होते. यावेळी कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प.) आनंद भंडारी, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर आदी उपस्थित होते.

श्री.गेडाम म्हणाले, शिर्डी विमानतळ विस्तारीकरणाच्या कामांचा वेग वाढविण्यात येऊन पुढील सहा महिन्यांच्या आत कामे पूर्ण करण्यात यावीत. रेल्वे स्थानकावरील ताण कमी करण्यासाठी 'कोपरगाव पॅटर्न' राबविण्यात यावा. शिर्डी हे टर्मिनस असल्याने गाड्या वळवण्यासाठी वेळ लागतो. त्यामुळे लांब पल्ल्याच्या गाड्यांना कोपरगावला थांबा देऊन तिथून बसेसद्वारे भाविकांना शिर्डीत आणण्याचे नियोजन करण्यात यावे. शिर्डी-राहाता बायपासच्या कामाचा दर्जा उत्तम राहील, याची अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी. आपण स्वतः या कामाची व साहित्याची पाहणी करणार असून, त्रुटी आढळल्यास काम पुन्हा करण्यास सांगितले जाईल. नगर-मनमाड महामार्गाचे काम डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने करावे.

नाशिकमधील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी व भाविकांचा वेळ वाचवण्यासाठी 'शिर्डी ते त्र्यंबकेश्वर' थेट बस सेवा सुरू करण्यात यावी. तसेच, जड वाहनांमुळे होणारी कोंडी टाळण्यासाठी मनमाडकडून येणारी वाहने 'येवला - वैजापूर - गंगापूर - नेवासा - अहिल्यानगर' या मार्गाने वळवण्यात यावीत. एस.टी. महामंडळातर्फे पर्वणी काळात दररोज ६८० फेऱ्यांचे नियोजन करण्यात आले असल्याचे यावेळी एस.टी महामंडळाचे विभाग नियंत्रक यांनी यावेळी सांगितले.

पार्किंग क्षेत्रातील कचरा उचलण्यासाठी घंटागाड्यांऐवजी ट्रॅक्टरचा वापर करण्याचे निर्देश विभागीय आयुक्तांनी दिले. तसेच स्वच्छतेसाठी ५०० अतिरिक्त कर्मचारी नियुक्त करण्यात यावेत. पिण्याच्या पाण्यासाठी टँकरऐवजी पाईपलाईनवर भर देण्यात यावा, यासाठी निळवंडे कालव्यावरून पाणी उचलण्याचे नियोजन करावे. अखंडित वीज पुरवठ्यासाठी बाभळेश्वर येथून पर्यायी लाईन टाकण्यात यावी, अशा सूचनाही श्री.गेडाम यांनी दिल्या.

कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह यांनी गर्दी नियंत्रणासाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरावर भर दिला जाणार असल्याचे सांगितले. ते म्हणाले, शिर्डीच्या १५ कि.मी. आधीपासून मराठी, हिंदी व इंग्रजी अशा तीन भाषांमध्ये दिशादर्शक फलक लावण्यात येतील. पार्किंगच्या उपलब्धतेची माहिती देण्यासाठी 'डिजिटल स्क्रीन्स' उभारण्यात येणार असून, संपूर्ण परिसर सीसीटीव्ही व पब्लिक अनाउन्समेंट सिस्टीमने जोडला जाईल. प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यासाठी स्पेशल युनिट व अतिरिक्त मनुष्यबळ वापरण्याचे निर्देश देण्यात येणार आहे.

कुंभमेळ्यात मोबाईल नेटवर्क सुरळीत राहण्यासाठी १४ नवीन टॉवर्स व ५ फिरते टॉवर्स उभारण्यात येणार आहेत. तसेच, अग्निशमन सेवेसाठी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची मागणी नाशिकच्या एकत्रित प्रस्तावात समाविष्ट करण्याच्या सूचना बैठकीत देण्यात आल्या.

या बैठकीला महसूल, जिल्हा परिषद, साईबाबा संस्थान, शिर्डी नगरपरिषद, पोलीस, सार्वजनिक बांधकाम, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, शिर्डी विमानतळ, रेल्वे, एस.टी.महामंडळ व महावितरण या विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## दिव्यात महायुतीच्या सर्व उमेदवारांचा ऐतिहासिक विजय; इतरांचा सुपडा साफ

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २०२६ मधील महायुतीच्या सर्व उमेदवारांचा ऐतिहासिक विजय झाला असून इतर उमेदवारांचा सुपडा साफ झाला आहे. दिवा प्रभाग समितीतील प्रभाग २७, २८ व २९ मधील शिवसेना भाजप महायुतीचे सर्व उमेदवार मोठ्या मता धिक्याने निवडून आले आहे.

शिवसेनेचे एकूण १० तर भाजपची एक महिला उमेदवार मिळून एकूण ११ ही उमेदवार निवडून आले मतदारांना आपला कौल महायुतीला दिला असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

दिवा प्रभाग समितील प्रभाग क्र २७ मधील शिवसेनेचे उपशहर प्रमुख व उमेदवार शैलेश मनोहर पाटील यांना एकूण 18,502 मतांनी विजयाची हॅट्रिक मारली असून स्नेहा अमर पाटील यांना एकूण 16,195 मते मिळाली, दीपाली उमेश भगत यांना 15,153 तर अँड. आदेश कमलाकर भगत यांनी 15, 277 मिळवून मोठ्या मताधिक्याने निवडून आले आहे. प्रभाग क्र २८ मधील दर्शना चरणदास म्हात्रे देखील मोठ्या मताधिक्याने विजयी झाल्या असून दीपक जाधव,



शहरप्रमुख रमाकांत मढवी व दिव्यातील सर्वात कमी वयाची असलेली उमेदवार साक्षी रमाकांत मढवी यांना देखील मतदारांनी कौल देऊन विजयी केले आहे. प्रभाग क्र २९ मधील शिवसेनेचे बाबाजी पाटील व अर्चना प्रविण (निलेश) पाटील व भाजपच्या वेदिका साहिल पाटील देखील मोठ्या मताधिक्याने निवडून आल्या आहेत. प्रसंगी दिव्यात मोठ्या थाटात व उत्साहात सर्व नगरसेवकांचा आनंद उत्सव साजरा करण्यात आला तर राजकारणातील शिवसेना भाजप महायुतीचा हा ऐतिहासिक विजय असल्याचे माजी उपमहापौर रमाकांत मढवी यांनी स्पष्ट केले.

## एक हात मायेचा

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

नांदेड जिल्हा महिला कॉंग्रेसच्या उपाध्यक्षा तथा माजी जी. प. सदस्या सौ. वर्षाताई भोसीकर यांनी विजेचा तार कोसळून मृत झालेल्या गयाबाई माडगे यांच्या घरी भेट देऊन या संकटातुन सावरण्यासाठी त्यांना शक्ती मिळो अशी प्रार्थना त्यांनी केली.या संकटकाळात मी तुमच्या पाठीशी आहे अशा शब्दात त्यांनी आधार दिला. काही दिवसापूर्वी कंधार तालूका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष संजय भोसीकर यांनी स्वप्नभूमीनगर कंधार येथे माडगे परिवाराची भेट घेऊन सांत्वन केले होते सोबतच माडगे यांच्या दोन मुलाचे पालकत्व स्वीकार करून त्यांना आर्थिक मदत केली. याचाच एक भाग मनून आज सौ. वर्षाताई भोसीकर यांनी मुलांना शैक्षणिक साहित्य,कपडे व घरगुती सामान या वेळी आणून दिले व आणखी काही अडचण आली तर सांगा आम्ही सर्व परीने मदत करू असे त्यांनी यावेळी सांगितले.

## अहिल्यानगरमध्ये महायुतीचा ऐतिहासिक विजय !

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहील्यानगर महापालिका निवडणुकीत मिळालेल्या ऐतिहासिक विजयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दूरध्वनीवरून पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांचे विशेष अभिनंदन केले असून,विधानसभा, नगरपरीषद आणि महानगरपालिका निवडणुकीत मिळालेले यश हे भाजपा युतीने केलेली विजयाची हॅट्रीक असल्याची असल्याची प्रतिक्रीया मंत्री ना.विखे पाटील यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केली. विधानसभा नगरपरीषद आणि महापालिका निवडणुकीत मिळालेला विजय विश्वनेते पंतप्रधान नरेंद्र मोदी केंद्रीय मंत्री अमित शाह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अहील्यानगरच्या जनतेला समर्पित करीत असल्याचे त्यांनी याप्रसंगी आ.संग्राम जगताप डॉ सुजय विखे भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग शहराचे अध्यक्ष अनिल मोहीते विनायक देशमुख सुनिल रामदासी उपस्थित होते. शहरातील आशीवार्द बंगल्यावर मंत्री विखे पाटील यांनी नवनिर्वाचित नगरसेवक युतीच्या कार्यकर्त्यासमवेत जल्लोष साजरा केला.भगव्या गुलालाची उधळण करून ऐतिहासिक विजयाचा आनंद साजरा करताना मंत्री विखे पाटील यांनीही घोषणा देवून युतीच्या कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवला.पत्रकार परिषद सुरू असतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्री विखे पाटील आ.संग्राम जगताप आणि डॉ सुजय विखे पाटील यांचे विजयाबद्दल अभिनंदन केले. आ.संग्राम जगताप आणि डॉ सुजय विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली ही निवडणुक लढवण्यात आली.विकासाची एक भूमिका घेवून आम्ही जनतेसमोर गेलो होतो.जनतेने भाजपा राष्ट्रवादी युतीला मोठे समर्थन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अहील्यानगरच्या सभेतच विजयाची हॅट्रीक पूर्ण करण्याचा दिलेला शब्द आजच्या विजयाने पूर्ण केल्याची भावना मंत्री विखे पाटील यांनी बोलून दाखवली.

राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाला मोठे यश पाहाता राज्यातील जनतेन त्यांच्या नेतृत्वाला मोठे समर्थन दिल्याचे स्पष्ट झाले.मुंबई पुणे महापालिका प्रमाणेच अन्य शहरामध्ये महायुती सरकारच्या माध्यमातून सुरू असलेल्या विकासात्मक बदलाला लोकांनी स्विकारले हेच या निकालाने दाखवून दिले असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

ठाकरे बंधूच्या एकत्र येण्याने कोणताही फरक पडणार नाही हे निवडणुकीपुर्वीच मी सांगितले होते तेच निकालातून स्पष्ट झाले. झोपेतून जागे व्हायचे आणि निवडणुकीला जायचे हे दिवस आता संपले आहेत.लोकांनी महाविकास आघाडीच्या नेत्यांना त्यांची जागा दाखवून दिली आहे. पराभव झाला की फक्त निवडणूक आयोग आणि ईव्हीएमवर टिका करण्यापलिकडे महाविकास आघाडीकडे कोणताही अजेंडा नसल्याची टिका ना.विखे पाटील यांनी केली. अहिल्यानगर जिल्ह्याने विधानसभा निवडणुकीत महायुतीला मोठे पाठबळ दिले. नगरपालिका निवडणुकीत भाजपाचा स्ट्राइक रेट तसाच राखला गेला.महानगर पालिकेच्या यशावर जनतेने केलेले शिक्कमोर्तब पाहाता आगामी जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत देखील भाजपाला मोठे यश मिळेल असा विश्वास मंत्री विखे पाटील यांनी व्यक्त केला.

## अहिल्यानगर महानगरपालिकेवर महायुतीने निर्भेळ यश संपादन करत वर्चस्व प्रस्थापित

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

दोन वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर पार पडलेल्या अहिल्यानगर महानगरपालिका निवडणुकीचा निकाल अखेर स्पष्ट झाला आहे. या निवडणुकीत भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) महायुतीने निर्भेळ यश संपादन करत महापालिकेवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. ६८ जागांच्या सभागृहात युतीने बहुमताचा आकडा सहज पार केला असून, विरोधकांचा दारूण पराभव झाला आहे.

या निवडणुकीत माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप या जोडगोळीने केलेली रणनीती यशस्वी ठरली आहे. या विजयानंतर महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या बंगल्यावर कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली असून, गुलाल उधळत आणि फटाके फोडून जल्लोष केला जात आहे. राधाकृष्ण विखे पाटील यांनी स्वतः कार्यकर्त्यांसोबत या उत्सवात सहभागी होऊन विजयाचा आनंद साजरा केला.



या निवडणुकीत सर्वात मोठा धक्का राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि मनसेला बसला आहे. शरद पवार यांच्या पक्षाला शहरात एकही जागा जिंकता आली नाही, तर राज ठाकरे यांच्या मनसेलाही खाते उघडण्यात अपयश आले आहे. महायुतीने मिळवलेल्या यशामुळे शहराच्या विकासकामांना वेग येईल, असा विश्वास युतीच्या नेत्यांनी व्यक्त केला आहे.

**एकूण ६८ जागा**

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट): २७ जागा
भारतीय जनता पक्ष (भाजप): २३ जागा
शिवसेना (एकनाथ शिंदे गट): १२ जागा
काँग्रेस: ०२ जागा
एमआयएम (AIMIM): ०२ जागा
शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे): ०१ जागा
बहुजन समाज पार्टी (BSP): ०१ जागा

## पदयात्रेचे २० रोजी प्रस्थान

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

श्रीश्रीश्री१००८प.पु.महंत मधुसुदन भारती महाराज यांच्या कृपाशिंवादाने हि दिंडी 41वर्षा पासुन अविरतपणे सुरु झालेल्या श्री क्षेत्र माहुर शिखर पदयात्रा दिंडीला 20जानेवारी2026रोजी दुपारी 12.30 वाजता वाजता श्रीदत्तकुंज निवास बहाद्दरपुरा येथून श्री माधवराव पा. पेठकर माजी सरपंच बहाद्दरपुरा यांच्या हस्ते श्रीफळ फोडून दिंडीचे प्रस्थान होणार आहे. हि पदयात्रा मंगळवार 20जानेवारी 2026रोजी श्री दत्त कुंज निवास बहाद्दरपुरा येथून निघुन चिखलभोसी मार्गे सोनखेड,नांदेड,दाभड,पार्डी,वा रंगा,शिवदरा,मानवाडी,हदगाव दत्तबर्डी,उमरखेड,नांदगव्हाण ,मुडाणा,वाघनाथ,हिवरा या मार्गे दत्तशिखर गडावर दिनांक 28जानेवारी 2026रोजी पोहचणार आहे.



ठाणे : दिवा प्रभाग समितील प्रभाग क्र २७ मधील शिवसेनेचे उपशहर प्रमुख व उमेदवार शैलेश मनोहर पाटील यांनी विजयाची हॅट्रिक मारली असून स्नेहा अमर पाटील, दीपाली उमेश भगत व अँड. आदेश कमलाकर भगत हे मोठ्या मताधिक्याने निवडून आले आहे. प्रसंगी दिवा शहरात ढोल ताश्याच्या गजरात मोठा आनंदोउत्सव साजरा करण्यात आला. ( फोटो - संतोष पडवळ )

## रिअल इंटरप्रायझेसच्या भरीव योगदानामुळे जि. प. शाळा डिजिटल होणार

**मुरबाड : (समर्थ गांवकरी)**

मुरबाड तालुक्यातील शाळा डिजिटल होण्यासाठी मा. तत्कालीन पालकमंत्री श्री शंभूराज देसाई साहेब यांच्या विकासनिधीतून नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत Real Enterprizes (होम रिव्हाईज) मार्फत नुकताच ऑल इन वन डिव्हाईस (प्रोजेक्टर)चे मुरबाड तालुक्यातील खालील 23 जि .प. शाळांना वाटप करण्यात आले.

जांभुर्डे,किशोर,कोरावळे,भुवन, म्हसा, देवगाव,टाकीचीवाडी, शास्त्रीनगर,मुरबाड 2,माळीपाडा, शिरगाव, कुडवली,कोलठण, मानिवली गो.,वडवली,शिरवली,खेवारे-महाज,खोपिवली,वैशाखरे, डोंगरन्हावे,पाटगाव, सोनावळे, खापरी. ही मदत मिळवून देण्यासाठी श्री.ज्ञानेश्वर ठाकरे भुवन,श्री भालचंद्र ठाकरे सर,श्री तुषार तुंगार खांडपे, यांनी मोलाचे योगदान दिले. तसेच मुरबाडचे गटशिक्षणाधिकारी मा. श्री. मधूकर घोरड साहेब व शिक्षण विभागाचे मार्गदर्शन लाभले. ऑल इन वन प्रोजेक्टर मध्ये 1 ली ते 8 वी चा अभ्यासक्रम इ- लर्निंग स्वरूपात असल्याने विद्यार्थ्यांसाठी तो सोपा व आनंददायी असून कायमस्वरूपी लक्षात राहणारा आहे. शिवाय प्रोजेक्टर मध्ये इनबील स्पीकर व C P U असल्याने स्क्रीन, CPU, माउंटनबॉल व स्पीकर चा वेगळा सेटअप करण्याची गरज नाही. पोर्टेबल असल्याने प्रोजेक्टर गरजेप्रमाणे एका क्लासमधून दुसऱ्या क्लासमध्ये सहज नेता येतो,त्यामुळे गरजेप्रमाणे कोणताही वर्ग डिजिटल बनविता येतो.त्यामुळे शाळेतील सर्व विद्यार्थ्यांपर्यंत आधुनिक पद्धतीचे शिक्षण जि .प. शाळांतही पोहोचविता येते.

## अहिल्यानगर मनपा निवडणुकीत निवडून आलेल्या नगरसेवकांची यादी जाहीर

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)- भाजप युतीने निर्विवाद वर्चस्व मिळविले आहे. या युतीने ६८ पैकी ५२ जागा जिंकल्या. त्यामध्ये राष्ट्रवादी २७ व भाजपने २५ जागांवर विजय मिळविला.

युतीच्या या झंजावाता पुढे विरोधक भुईसपाट झाले. शिवसेना (शिंदे गट) १०, काँग्रेस व एमआयएम प्रत्येकी २, ठाकरे गट व बहुजन समाज पक्ष प्रत्येकी १ असे संख्याबळ प्राप्त झाले आहे.

अहिल्यानगर महानगरपालिकेत निवडून आलेल्या नगरसेवकांची यादी जाहीर

अहिल्यानगर महानगरपालिका

प्रभाग १ अ – सागर बोरूडे (राष्ट्रवादी)
ब – शारदा ढवन (भाजप)
क – दिपाली बारस्कर (राष्ट्रवादी)
ड – संपत बारस्कर (राष्ट्रवादी)
प्रभाग २ अ – रोशनी भोसले (भाजप)
ब – महेश तवले (राष्ट्रवादी)
क – संध्या पवार (राष्ट्रवादी)
ड – निखिल वारे (भाजप)
प्रभाग ३ अ – योगीराज गाडे (उबाठा)
ब – ज्योती गाडे (राष्ट्रवादी)
क – गौरी बोरकर (राष्ट्रवादी)
ड –ऋग्वेद गंधे (भाजप)
प्रभाग ४ अ – शेख शहेनाज खालिद (एमआयएम)
ब – सय्यद शहाबाज अहमद (एमआयएम)
क – खान मिनाज जाफर (कॉंग्रेस)
ड – खान शम्स समीउल्ला (कॉंग्रेस)
प्रभाग ५ अ – काजल भोसले (राष्ट्रवादी)
ब – धनंजय कृष्णा जाधव (भाजप)
क – हरिप्रीतकोर गंभीर (राष्ट्रवादी)
ड – मोहित पंजाबी (राष्ट्रवादी)
प्रभाग ६ अ – मनोज दुलम (भाजप)
ब – सोनाबाई तायगा शिंदे (भाजप)
क – सुनीता कुलकर्णी (भाजप)
ड – करण उदय कराळे (भाजप)
प्रभाग ७ अ – वर्षा सानप (भाजप)
ब – पुष्पा अनिल बोरूडे (भाजप)
क – वंदना विलास ताठे (भाजप)
ड – बाबासाहेब वाकळे (भाजप)
प्रभाग ८ अ – सुनीता भिंगारदिवे (राष्ट्रवादी)
ब – आशा कातोरे (भाजप)
क –नवनाथ कातोरे (शिवसेना शिंदे)
ड – कुमार वाकळे (राष्ट्रवादी)
प्रभाग ०९ अ – संजय शेंडगे (शिवसेना शिंदे)
ब – रुपाली दातरंगे (शिवसेना शिंदे)
क – वैशाली नळकांडे (शिवसेना शिंदे)
ड – महेश लोंढे (भाजप)
प्रभाग १० अ – श्रीपाद शंकर छिंदम (बसपा)
ब – शितल अजय ढोणे (भाजप)
क – मयुरी सुशांत जाधव (भाजप)
ड – सागर राजु मुर्तडकर (भाजप)
प्रभाग ११ अ – उमेश खंडेराव कवडे (शिवसेना शिंदे गट)
ब – सुनिता संतोष गणप्पा (शिवसेना शिंदे गट)
क – आशा किशोर डागवले (राष्ट्रवादी)
ड – सुभाष सोपानराव लोंढे (भाजप)
प्रभाग १२ – मंगल सुनील लोखंडे (शिवसेना)
ब – सुरेखा संभाजी कदम (शिवसेना)
क – बाळासाहेब बोऱ्हाटे (शिवसेना)
ड – दत्तात्रय कावरे (शिवसेना)
प्रभाग १३ – सुरेश बनसोडे (राष्ट्रवादी)
ब – सुजाता महेंद्र पडोळे (राष्ट्रवादी)
क – अनिता विपुल शेटिया (राष्ट्रवादी)
ड – अविनाश हरिभाऊ घुले (राष्ट्रवादी)
प्रभाग १४ – प्रकाश भागनागरे (राष्ट्रवादी)
ब – सुनिता भगवान फुलसौंदर (राष्ट्रवादी)
क – मिना संजय चौपडा (राष्ट्रवादी)
ड – गणेश कुंडलिक भोसले (राष्ट्रवादी)
प्रभाग १५ – पौर्णिमा गव्हाळे (राष्ट्रवादी)
ब – दत्तात्रय गाडळकर (भाजप)
क – गितांजली काळे (राष्ट्रवादी)
ड – सुजय मोहिते (भाजप)
प्रभाग १६ – सविता कांबळे (राष्ट्रवादी)
ब – वर्षा काकडे (राष्ट्रवादी)
क – विजय पठारे (भाजप)
ड – ज्ञानेश्वर येवले (भाजप)
प्रभाग १७ – मयुर बांगरे (राष्ट्रवादी)
ब – अश्विनी लोंढे (राष्ट्रवादी)
क – कमल कोतकर (भाजप)
ड – मनोज कोतकर (भाजप)

बिनविरोध निवडून आलेले
१. कुमारसिंह वाकळे (राष्ट्रवादी)
२. प्रकाश भागनागरे (राष्ट्रवादी)
३. करण कराळे (भाजप)
४. सोनाबाई शिंदे (भाजप)
५. पुष्पा अनिल बोरूडे (भाजप)

# शरद पवार हारले, ओवेसी जिंकले

(समर्थ गांवकरी)

संपूर्ण राज्यात भाजपचा जल्लोष चालू आहे . परंतु महानगरपालिका निवडणुकीत शरद पवार व अजित पवार हे दोन दिग्गज हारले . परंतु एम. आय. एम. पक्षाचे असदउद्दीन ओवेसी हे मात्र राज्याच्या राजकारणात चमकले आहेत. पवार काका पुतण्यांची राजकारणातली पीछेहाट व एमआयएमची होत असलेली वरचढ प्रगती याकडे एका वेगळ्या नजरेने पाहिले जात आहे. ज्याप्रमाणे भाजपच्या विजयाचा डंका वाजवला जात आहे त्या ठिकाणी या नेत्यांच्या निकालाने मात्र भल्याभल्यांना अचंबून टाकले आहे.

पूर्ण राज्याचे लक्ष लागून असलेल्या मुंबई महानगरपालिकेवर अखेर भाजपा व एकनाथ शिंदे गटाच्या शिवसेनेने वर्चस्व स्थापन केले आहे. मुंबईत महायुतीचा महापौर होणार हे निश्चित झाले आहे. राज्यात पहिल्या क्रमांकाचा पक्ष म्हणून भाजप अग्रेसर आहे. भाजपचे सर्वाधिक नगरसेवक निवडून आल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांचे व सहकाऱ्यांचे हे यश मानले जात आहे. मुंबई महानगरपालिकेची निवडणूक खूप रंगली. या ठिकाणी ठाकरे बंधू एकत्र आल्याने काय चमत्कार घडेल याकडे सर्वांचे लक्ष होते. अखेर मुंबईच्या मतदारांनी ठाकरे बंधूपेक्षा महायुतीकडे सत्ता देण्याला पसंती दर्शविली. मुंबईत महायुती स्पष्ट बहूमतात आली असून ठाकरे बंधूना हा मोठा झटका मानला जात आहे. विशेष म्हणजे यंदा मुंबई महापालिकेत एम.आय.एम. या पक्षाने प्रवेश मिळविला आहे. मराठवाड्यात २०१७ च्या मनपा निवडणुकीत एम.आय.एम. पक्षाचे उमेदवार निवडून आल्यानंतर राज्यात या पक्षाची ओळख निर्माण झाली. मराठवाड्याच्या शेजारी असलेल्या तेलंगणा राज्यातून एमआयएम पक्षाने सर्वप्रथम नांदेड महानगरपालिकेत 2017 मध्ये तेरा नगरसेवक निवडून आणले. तसेच छत्रपती संभाजीनगरमध्येही एम .आय. एम . पक्षाने पाय पसरले. हळूहळू या पक्षाने नवी मुंबई, मुंबई या ठिकाणी पाय रोवण्यास सुरुवात केली. यंदाच्या महापालिका निवडणूकीत एम.आय.एम. पक्षाला मुंबईत प्रवेश मिळाला. संपूर्ण राज्यात 15 पेक्षा अधिक महानगरपालिकेत एमआयएम पक्षाचे नगरसेवक निवडून आले आहेत. त्याउलट देशाच्या स्वातंत्र्यानंतर राजकारणात ज्यांची वेगळी ओळख आहे असे शरद पवार मात्र यंदाच्या महानगरपालिका निवडणुकीत कमालीचे पिछाडीवर आले आहेत. त्यांचे नाव महानगरपालिकेच्या राजकारणातुन धुसर होत आहे. ज्या ठिकाणी ओबीसींनी 15 महानगरपालिकेत





## डॉ. अभयकुमार दांडगे, नांदेड

स्वतःचे नगरसेवक निवडून आणले त्याचप्रमाणे 15 पेक्षा अधिक महानगरपालिकेत शरद पवार यांना एकही नगरसेवक निवडून आणता आला नाही, ही एक मोठी राजकीय शोकांतिका राज्याच्या राजकारणात समोर आली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे ही राज्यात असेच हाल झाले. अनेक ठिकाणी अजित पवारांच्या उमेदवारांना भोपळाही फोडता आला नाही. पवार काका पुतणे महानगरपालिकेच्या निवडणूक आपटून पडले आहेत. तर त्या उलट मात्र असदुद्दीन ओवेसी यांचा एम. आय. एम. पक्ष चर्चेत राहिला आहे. या पक्षांची तुलना दुर्लक्ष करून चालणार नाही.

राज्यात २९ महानगरपालिकांची मतमोजणी शुक्रवारी सकाळी १० वाजता सुरू झाली. सायंकाळी उशिरापर्यंत हळूहळू सर्व महानगरपालिकांचे निकाल हाती आले. अनेक ठिकाणी उमेदवारांनी एकमेकावर आक्षेप घेतल्यामुळे काही वेळ मतमोजणी रखडली होती. तसेच दुबार मतमोजणी करावी लागल्याने निकाल येण्यासाठी अपेक्षेपेक्षा जास्त वेळ लागला. मराठवाड्यात लातूर येथे भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या विषयी केलेल्या वक्तव्याचा फटका भाजपला बसल्याचे दिसून आले. लातूरमध्ये काँग्रेस व त्यांचे सहकारी असलेल्या वंचित बहूजन आघाडीने भाजपला सत्तेपासून रोखण्यात यश मिळविले. या ठिकाणी देशमुख कुटुंबीय हेच लातूरच्या विकासाचे धनी असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले. छत्रपती संभाजीनगर येथे भाजपला सत्ता स्थापनेचा मार्ग मोकळा झाला. या ठिकाणी एम. आय. एम. हा दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला . मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागपूर महानगरपालिकेत भाजपने मोठे यश मिळविले. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नागपूरमध्ये भाजपला हे यश अपेक्षितच होते . मराठवाड्यातील आणखी एक चर्चेचा विषय म्हणजे परभणी महानगरपालिका निवडणुकीत भाजपला सत्ता मिळवता येणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. या ठिकाणी उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे खा. बंडू जाधव यांना मतदारांनी पसंती दर्शविली आहे. राज्याच्या मंत्री मेघना बोर्डीकर यांना ही एक मोठी चपराक मानली जात आहे. नांदेडमध्ये भाजपला एकहाती सत्ता मिळवता आली. खा. अशोकराव चव्हाण यांना नांदेडमध्ये पुन्हा एकदा भाजपच्या रुपाने मतदारांनी साथ दिली. त्यामुळे नांदेडमध्ये पहिल्यांदाच भाजपचा महापौर होणार आहे. नांदेडमध्येही एमआयएम पक्षाला 15 जागा मिळाल्या आहेत . तसेच भाजपला जालनामध्ये स्पष्ट बहूमत मिळाले आहे. जालनामध्ये भाजप हा सर्वात मोठा पक्ष म्हणून समोर आला आहे. याबरोबरच पिंपरी चिंचवड येथेही भाजपला स्पष्ट बहूमत मिळाले आहे. शरद पवार व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा हा गड त्यांच्या हातातून गेला आहे . मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील तमाम जनतेचे आभार मानले आहेत. राज्यात महायुतीचे सरकार आहे. त्यामुळे शहरांचा विकास करत असताना भाजपच्या ताब्यात आलेल्या महानगरपालिकांचा चांगलाच विकास होणार आहे. मतदारांनी देखील राज्यात व केंद्रात सत्ता कोणाची याचा विचार करून भाजप, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला चांगल्या प्रमाणात मतदान केले. भाजपने आखलेली रणनिती यशस्वी करण्यात भाजपची यंत्रणा यशस्वी ठरली आहे. या महानगरपालिका निवडणुकीतील महत्त्वाचे राजकीय टप्पे म्हटले तर ठाकरे बंधूचा पराभव तसेच पुण्यात काका व पुतणे एकत्र येवूनही अजित पवार व शरद पवार यांना म्हणावे तसे यश पदरी पडले नाही. त्यांच्या तुलनेत अकबरुद्दीन ओवेसी यांच्या एमआयएमने राज्यात दमदार एन्ट्री घेतली आहे. महानगरपालिकेच्या निवडणुकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात भाजपवर आगपाखड केली. त्यामुळे त्यांना राज्याच्या राजकारणात या आगपाखडीची नक्कीच भरपाई करावी लागणार आहे. भाजपने त्यांच्या गडामध्ये मिळविलेले यश व घेतलेली उचल काका पुतण्यांच्या पायाखालची वाळू सरकविण्यासाठी पुरेशी आहे. यंदाची महापालिका निवडणूक भाजप व शिंदे सेनेला फलदायी ठरली. आता फेब्रुवारी महिन्यात होणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायतसमिती निवडणुकीत या महापालिका निवडणुकीचा प्रभाव नक्कीच दिसून येणार आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीची निवडणूक लढवून जास्तीत जास्त जि.प. व पं.स.ताब्यात घेण्यासाठी भाजप पुन्हा एकदा अंग झटकून कामाला लागणार आहे. या निवडणुकीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे भाजपचे असलेले सत्तेचे ध्येय या निमित्ताने पूर्ण झाले आहे. तिकीट वाटप करत असतांना भाजपला निष्ठावंतांना न्याय देता आला नाही. इतर पक्षातील आयात उमेदवार आपल्याकडे घेवून भाजपने त्यांना उमेदवारी दिली. ते उमेदवार विजयी झाल्याने शेवटी हा विजय भाजपच्या कोट्यात आला. महानगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने भाजपने निर्विवाद यश मिळविले आहे, त्यामुळे भविष्यात भाजपच राज्यात सर्वात मोठा पक्ष म्हणून समोर येईल, यात शंका नाही.

## थोडक्यात बातम्या...

### शिवीगाळ व बेदम मारहाण करणाऱ्या दोघांना कारावास व दंड

राजगुरुनगर (स. गांवकरी) : कपडे इस्त्री करण्याच्या वादातून झालेल्या भांडणात ग्राहकाला बेदम मारहाण करणाऱ्या दोघांना ३ वर्षे सश्रम कारावास आणि प्रत्येकी २ हजार रुपये दंडाची शिक्षा राजगुरुनगर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचे न्यायाधीश ए एस सय्यद यांनी सुनावली आहे. तेजस वसंतराव फुलावरे, सचिन उर्फ पप्पू वसंतराव फुलावरे असे शिक्षा झालेल्या आरोपींची नावे आहेत. तर आरोपीचे वडील वसंतराव फुलावरे यांची आरोपातून मुक्तता केली आहे. या खटल्याची माहिती अशी, दि.२० एप्रिल २०१३ रोजी चाकण शहरातील माणिक चौकात हार्दिक भालचंद्र पिंगळे हा वसंतराव फुलावरे यांच्या दुकानांत दुपारी बाराच्या सुमारास कपड्याला इस्तरी करण्यासाठी गेला होता. त्यावेळी हार्दिक पिंगळे यांनी वसंतराव फुलावरे यांना लग्नाला जायचे आहे कपड्यांना लवकर इस्त्री करून द्या असे म्हणाला त्यावेळी वसंतराव फुलावरे यांच्याशी वाद झाला. वादाचे रूपांतर शिवीगाळ करण्यात झाले या वेळी वसंतराव फुलावरे यांची मुले तेजस वसंतराव फुलावरे, सचिन उर्फ पप्पू फुलावरे सर्व राहणार चाकण यांनी हार्दिक पिंगळे याला शिवीगाळ करीत कात्रीने मारहाण केली, त्यानंतर जिवे मारण्याची धमकी दिली. यात हार्दिक भालचंद्र पिंगळे हे जखमी झाले होते. त्यांनी चाकण पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. चाकण पोलिसांनी दोन्ही मुलांसह वसंतराव फुलावरे यांच्या विरोधात भादवि कलम ३०७,३२३,५०४,५०६,३४ अन्वये गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्याचा तपास तत्कालीन पोलिस निरीक्षक सुशील कदम यांनी केला होता. हा खटला राजगुरुनगर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयात न्यायाधीश ए एस सय्यद यांच्या कोर्टात सुरू होता. सरकारी पक्षाच्या वतीने सरकारी वकील मिलिंद पांडकर यांनी ७ जणांची साक्ष घेतली. जखमी फिर्यादी, प्रत्यक्षदर्शी यांची साक्ष महत्वाची ठरली. फिर्यादी तर्फे अॅड रजनी देशपांडे यांनी काम पाहिले. न्यायाधीश ए एस सय्यद यांनी तेजस वसंतराव फुलावरे, सचिन उर्फ पप्पू फुलावरे यांना दोषी ठरवून शिक्षा ठोठावली. भादवि कलम ३०७ ऐवजी ३२४ अन्वये तीन वर्षे सश्रम कारावास व प्रत्येकी दोन हजार रुपये दंड, दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावास, भादवि कलम ३२३,५०४,५०६ अन्वये प्रत्येकी ६ महिने साधी कैद, एक हजार रुपये दंड, दंड न भरल्यास तीन महिने सश्रम कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.


**जाहीर नोटीस**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/०५/२०२६ अकोले दि. १६/०१/२०२६

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. जयदेव किसन ठोंबाडे, रा. इंदुरी**, ता. अकोले जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये **यांचा स्वतः जयदेव किसन ठोंबाडे यांचा जन्म दि. ०१/०६/१९६३ रोजी धुमाळवाडी** येथे झाला असल्याची नोंद ग्रामपंचायत कार्यालय **धुमाळवाडी**, ता. अकोले यांचे जन्म–मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे. तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. जयदेव किसन ठोंबाडे, रा. इंदुरी** ता.अकोले जि. अहिल्यानगर **यांचा स्वतः जयदेव किसन ठोंबाडे यांचा जन्म दि. ०१/०६/१९६३ रोजी धुमाळवाडी** येथे झाला आहे. सदर जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय **धुमाळवाडी**, ता.अकोले, जि. अहिल्यानगर येथे जन्माची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. तहसिल कार्यालयासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. तहसिलदार साहेबांसमोर पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. १६/०१/२०२६ रोजी सही व शिक्कयानिशी दिले असे.

**कामगिरी क्लर्क**

**हुकूमावरुन,**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**


## सांगवडे गावात PRA उपक्रमाचे यशस्वी आयोजन



**सांगवडे(मावळ) :** (समर्थ गांवकरी)

ग्रामपंचायत व पद्मभूषण वसंत दादा पाटील कृषी महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने गावात सहभागात्मक ग्रामीण मूल्यमापन (Participatory Rural Appraisal – PRA) उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष क्षेत्रात उतरून गावातील सामाजिक, आर्थिक व कृषीविषयक माहिती संकलित केली. कृषी कन्यांनी गावाचा सामाजिक व संसाधन नकाशा तयार करण्याचे काम केले असून या प्रक्रियेत गावचे माननीय सरपंच रोहन जगताप यांनी स्वतः पुढाकार घेत नकाशा ओळखून देण्यासाठी व काढण्यासाठी मार्गदर्शन केले. रस्ते, पाण्याचे स्रोत, शेती क्षेत्र व सार्वजनिक सुविधा यांची नोंद कृषी कन्यांनी ग्रामस्थांच्या मदतीने केली. या उपक्रमात ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. यावेळी कृषी कन्या नंदिनी दोरगे, प्रेरणा धोत्रे, दिशा चव्हाण, सई पाटील, श्वेता मारडकर या उपस्थित होत्या. कृषी कन्यांनी PRA तंत्रांची माहिती देत समस्या विश्लेषण व हंगामी कॅलेंडर याबाबत मार्गदर्शन केले. या उपक्रमामुळे गावाच्या विकासासाठी आवश्यक माहिती संकलित झाली असून भविष्यातील नियोजनासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरणार आहे.

## विरोधक कुठे आहेत? महानगरपालिका निवडणुकांत भाजपचा झंझावात

(समर्थ गांवकरी)





### डॉ. विश्वासराव आरोटे
कळसुबाई शिखरावरून

महानगरपालिका निवडणुकांचा नारळ फुटताच भारतीय जनता पार्टीने आक्रमक पद्धतीने राजकीय मैदान काबीज केलं. उमेदवारांच्या "इनकमिंग" पासून प्रचाराच्या रणनीतीपर्यंत भाजपने घेतलेल्या वेगामुळे सुरुवातीलाच एक प्रश्न उपस्थित झाला होता, विरोधक कुठे आहेत? आता एकामागून एक महानगरपालिकांचे निकाल समोर येत असताना, हा प्रश्न अधिकच ठळक होत चालला आहे. मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड तसेच मुंबई महानगर प्रदेश (एमएमआर) या सगळ्याच शहरी पट्ट्यांमध्ये भाजपने आपली ताकद सिद्ध केली आहे. शहरी मतदारांवर पकड, संघटनात्मक शिस्त आणि सत्तेचा प्रभाव यांचा योग्य वापर करत भाजपने निवडणूक निकालांवर वर्चस्व प्रस्थापित केलं आहे.

महानगरपालिकांच्या निकालांमध्ये सर्वात मोठा फटका बसला तो पारंपरिक विरोधकांना. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) अनेक ठिकाणी एक आकडी जागांवरच अडकलेली दिसते. काही महानगरपालिकांत तर त्यांची उपस्थिती केवळ औपचारिक ठरल्याचे चित्र आहे.

त्याचप्रमाणे शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची कामगिरी अत्यंत निराशाजनक ठरली. अनेक शहरी भागांत राष्ट्रवादी स्पर्धेतच दिसली नाही. काँग्रेसलाही अपेक्षेप्रमाणे मतदारांचा प्रतिसाद मिळाला नाही. भाजपच्या तुलनेत काँग्रेसची संघटनात्मक तयारी आणि प्रचार यंत्रणा कमी पडल्याचे स्पष्ट झाले.

भाजपचा हा विजय केवळ विरोधकांपुरता मर्यादित राहिलेला नाही. सत्तेतील मित्रपक्षांनाही भाजपने सोडलेले नाही. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना (शिंदे गट) यांच्या पारंपरिक बालेकिल्ल्यांमध्ये भाजपने थेट उमेदवार उभे करत अनेक ठिकाणी जागा खेचून घेतल्या. काही ठिकाणी शिंदे गटाच्या हक्काच्या जागांवर भाजपचे उमेदवार विजयी ठरल्याने अंतर्गत राजकारणातही हालचाली वाढल्या आहेत.

तसेच अजित पवार यांच्या राष्ट्रवादी गटालाही भाजपच्या आक्रमक रणनीतीचा फटका बसला. राष्ट्रवादीची पारंपरिक मतपेढी असलेल्या भागांत भाजपने संघटनात्मक ताकद दाखवत राष्ट्रवादीला दुय्यम स्थानावर ढकललं. भाजपच्या या यशामागे अनेक घटक कारणीभूत ठरले आहेत.

संघटनात्मक बळ: बूथ पातळीवरील मजबूत यंत्रणा, कार्यकर्त्यांची शिस्त आणि नियोजनबद्ध प्रचार. केंद्र आणि राज्यातील सत्तेमुळे विकासकामांचा प्रचार प्रभावीपणे पोहोचवण्यात यश.

विरोधकांची विभागणी: विरोधी पक्षांतील अंतर्गत मतभेद आणि गटबाजीचा भाजपने पुरेपूर फायदा घेतला.


शहरी मतदारांचा कल: पायाभूत सुविधा, विकास आणि स्थैर्य या मुद्द्यांवर शहरी मतदारांचा भाजपकडे झुकलेला कौल.

महानगरपालिका निवडणुकांच्या निकालांनी महाराष्ट्राच्या शहरी राजकारणात एक नवं चित्र स्पष्ट केलं आहे. भाजपने केवळ विरोधकांचा सुपडा साफ केला नाही, तर मित्रपक्षांच्या बालेकिल्ल्यांनाही सुरुंग लावला आहे. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्था आणि पुढील विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपचा आत्मविश्वास वाढलेला दिसतो.

आज राजकीय वर्तुळात चर्चेचा केंद्रबिंदू एकच आहे, भाजपच्या या विजयरथाला रोखणार तरी कोण?

**८ वर्षांपासून गुलामगिरीत असलेल्या कातकरी वेठबिगाराची सुटका : लढवय्या कातकरी तरुणांनी तोडले कातकरी मजुराचे गुलामीचे साखळदंड**

## भिवंडीत भूमिपुत्र एल्गार संघटनेचा दणका



**भिवंडी** (समर्थ गांवकरी)

भिवंडी तालुक्यातील एका वीटभट्टीवर गेल्या ८ वर्षांपासून अमानवीय परिस्थितीत वेठबिगारी करणाऱ्या दिनेश सुरेश भोईर या कातकरी आदिम जमातीच्या तरुणाची 'भूमिपुत्र एल्गार संघटने'च्या कार्यकर्त्यांनी यशस्वी सुटका केली आहे. याप्रकरणी गणेशपुरी पोलीस ठाण्यात रात्री (१५ जानेवारी) उशिरा वीटभट्टी मालकावर कठोर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, संघटनेच्या या धाडसी कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे. केवळ बयाना दिला म्हणून नाही तर जिथे खरच शोषण होत आहे, अत्याचार होत आहे तिथे भूमिपुत्र एल्गार संघटना कायद्याचा दणका देणारच अशी भूमिका संघटनेने घेतली आहे.

नेमकी घटना काय? दिनेश भोईर हा तरुण गेल्या ८ वर्षांपासून कल्पेश सूर्यकांत पाटील याच्या वीटभट्टीवर कामाला होता. अवघ्या ७५ हजार रुपयांच्या आगाऊ रकमेच्या (बयाणा) बदल्यात त्याला वेठबिगार बनवण्यात आले होते. गेल्या अनेक वर्षांपासून त्याचे आर्थिक आणि मानसिक शोषण सुरू होते. मालकाने त्याला मारहाण करून पत्नीला वारंवार कॉल करून बोलावत असल्याने हतबल झालेला दिनेश आत्महत्येच्या टोकाला पोहोचला होता.

याबाबतची माहिती मिळताच भूमिपुत्र एल्गार संघटनेचे सरचिटणीस नवनाथ भोये आणि कातकरी युवा कार्यकर्ती मृणाली पवार यांनी तत्काळ पुढाकार घेऊन दिनेश भोईर याची मदत केली. कार्यकर्त्यांनी या घटनेबाबत गणेशपुरी पोलिसांना सविस्तर माहिती दिली. पोलिसांनी या घटनेची प्रत्यक्ष पडताळणी करून जे काही कायदेशीर असेल त्याप्रमाणे कठोर कारवाई करावी, अशी मागणी संघटनेने लावून धरली. त्यानंतर पोलिसांनी वस्तुस्थिती तपासून गुन्हा दाखल केला आहे. याबाबतच्या कॉल रेकॉर्डिंग देखील दिनेश याने समोर आणल्या आहेत.

दाखल करण्यात आलेली कलमे : या गंभीर प्रकरणाची दखल घेत पोलिसांनी वीटभट्टी मालकावर खालील कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे:

* भारतीय न्याय संहिता (BNS), 2023: कलम 115(2), 352, 351(2)
* अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, 1989: कलम 3(2)(va), 3(1)(r), 3(1)(s)
* वेठबिगार पद्धती (उच्चाटन) अधिनियम, 1976: कलम 16, 17, 18

"दिनेश भोईर हा भूमिपुत्र एल्गार संघटनेने मुक्त केलेला पहिला वेठबिगार असून, केवळ सुटका करून आम्ही थांबणार नाही. शासनाकडे पाठपुरावा करून त्याचे योग्य पुनर्वसन आणि त्याला पूर्ण कायदेशीर न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत." आदिवासी मजूर बांधवांना रोजगार मिळायला हवा आणि स्थानिक वीटभट्टी मालक जे प्रामाणिकपणे व्यवसाय करतात त्यांचा व्यवसाय सुद्धा सुरू रहावा मात्र जिथे जिथे असे मारहाण आणि शोषणाचे प्रकार घडतील त्याच प्रकरणात आम्ही गुन्हा दाखल करण्याची भूमिका घेऊ, हा गुन्हा देखील केवळ बयाना रक्कमेचा नाही तर शोषणाचा आहे म्हणून दाखल झाला असल्याची माहिती भूमिपुत्र एल्गार संघटनेचे अध्यक्ष प्रमोद पवार आणि कार्याध्यक्ष सुनील लोणे यांनी दिली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# नगरचा महापौर कोण? पालकमंत्री म्हणाले...

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**




अहील्यानगर महापालिका निवडणुकीत मिळालेल्या ऐतिहासिक विजयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दूरध्वनीवरून पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांचे विशेष अभिनंदन केले असून, विधानसभा, नगरपरीषद आणि महानगरपालिका निवडणुकीत मिळालेले यश हे भाजपा युतीने केलेली विजयाची हॅट्रीक असल्याची असल्याची प्रतिक्रीया मंत्री ना.विखे पाटील यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केली.

विधानसभा नगरपरीषद आणि महापालिका निवडणुकीत मिळालेला विजय विश्वनेते पंतप्रधान नरेंद्र मोदी केंद्रीय मंत्री अमित शाह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अहील्यानगरच्या जनतेला समर्पित करीत असल्याचे त्यांनी आ.संग्राम जगताप डॉ सुजय विखे भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग शहराचे अध्यक्ष अनिल मोहीते विनायक देशमुख सुनिल रामदासी उपस्थित होते.

शहरातील आशीवार्द बंगल्यावर मंत्री विखे पाटील यांनी नवनिर्वाचित नगरसेवक युतीच्या कार्यकर्त्यासमवेत जल्लोष साजरा केला.भगव्या गुलालाची उधळण करून ऐतिहासिक विजयाचा आनंद साजरा करताना मंत्री विखे पाटील यांनीही घोषणा देवून युतीच्या कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवला.

पत्रकार परिषद सुरू असतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्री विखे पाटील आ.संग्राम जगताप आणि डॉ सुजय विखे पाटील यांचे विजयाबद्दल अभिनंदन केले.

आ.संग्राम जगताप आणि डॉ सुजय विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली ही निवडणुक लढवण्यात आली.विकासाची एक भूमिका घेवून आम्ही जनतेसमोर गेलो होतो.

जनतेने भाजपा राष्ट्रवादी युतीला मोठे समर्थन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अहील्यानगरच्या सभेतच विजयाची हॅट्रीक पूर्ण करण्याचा दिलेला शब्द आजच्या विजयाने पूर्ण केल्याची भावना मंत्री विखे पाटील यांनी बोलून दाखवली.

नगरचा पुढील महापौर आ.संग्राम जगताप व माजी खा.डॉ. सुजय विखे पा. चर्चा करून ठरवतील असेही पालकमंत्री विखे यांनी सांगितले.




## धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज राज्याभिषेक दिनानिमित्त भाजपाच्या कार्यालयात अभिवादन


**किनवट : (समर्थ गांवकरी)**

भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष संदीप केंद्रे यांच्या कार्यालयात धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यालयाच्या भिंतीवर लावलेल्या सुंदर पोस्टर व महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

दिवसभर चाललेल्या या कार्यक्रमास गोकुंदा जिल्हा परिषद, किनवट शहर भाजपा तसेच संलग्न संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भेट देऊन सहभाग नोंदवला. याप्रसंगी भाजपा मंडळ अध्यक्ष स्वागत आयनेनीवार, माजी नगरसेवक शिवाजी आंधळे, पत्रकार मुकुंद नेम्मानिवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे सुगत नगराळे यांच्यासह विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान छत्रपती संभाजी महाराज यांच्या नावाचा जयघोष करण्यात आला. उपस्थितांनी धर्मवीर संभाजी महाराजांच्या शौर्य, त्याग व बलिदानास अभिवादन करून त्यांच्या कार्याचा गौरव केला.

# सावरगाव येथे जेरबंद केले बिबट्यांचे बछडे

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**



सावरगाव हिंगे मळा येथे ऊसतोड कामगार ऊस तोडत असताना त्यांना एक बिबट्या आणि दोन बछडे आढळले.हिंगे मळ्यातील प्रगतशील शेतकरी शरद हिंगे यांच्या शेतामध्ये ऊसतोड कामगार ऊस तोडत असताना बिबट्या आणि त्यांची दोन बछडे आढळली बिबट्या मादी लगेच पळून गेली आणि दोन बछडे पकडले परंतु त्यातूनही एक बछडा पळून गेला आणि एक बछडा ऊसतोड कामगार आणि सावरगावातील ग्रामस्थ तुकाराम ढमढेरे यांनी जेरबंद केला. ही माहिती समजतात सावरगाव चे पोलीस पाटील रुपेश जाधव, सरपंच दीपक बाळसराफ, आणि वन अधिकारी महेश बगाड घटनास्थळी पोहोचले आणि जेरबंद असलेल्या बछड्याची पाहणी केली. हिंगे मळ्यातील ग्रामस्थांनी सांगितले की या ठिकाणी लवकरात लवकर तुम्ही पिंजरा लावा आणि असलेले सर्व बिबटे या ठिकाणावरून घेऊन जावा आमच्या जीवाला येथे धोका आहे दररोज शेतीमध्ये काम करण्यासाठी महिला व शेताला पाणी भरण्या साठी पुरुष नेहमीच शेतावर येत असतात म्हणून आमच्या जीवाला धोका आहे. लगेच पिंजरा लावा आणि असलेले सर्व बिबट्या ठिकाणावरून घेऊन जा. वनाधिकारी महेश बगाड यांनी वन खात्याशी संपर्क करून पिंजरा बोलावून घेतला आणि हिंगे मळा येथे बछडे सापडले त्या ठिकाणी पिंजरा लावला. आणि जेरबंद झालेल्या बिबट्याला वनाधिकारी घेऊन गेले. याप्रसंगी समिती उमेदवार संजय वऱ्हाडी वडज विठ्ठल वाडीचे सरपंच गणेश चव्हाण,सावरगाव ग्रामपंचायतचे सदस्य आशिष हिंगे, ग्रामस्थ चंद्रकांत बाळसराफ,शरद हिंगे,संतोष हिंगे, महेंद्र शेलार आकाश खरात सागर वाघुले समोर हिंगे, सुरेश हिंगे, त्याचप्रमाणे या घटनेची माहिती कळताच सावरगाव खिलारवाडीतील सर्व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सर्वांगीण विकासाकडे लक्ष

**(समर्थ गांवकरी)**

हिंद सेवा मंडळाच्या अकोले विभागातील ज्ञानवर्धिनी प्राथमिक शाळेचा 36 वे वार्षिक पारितोषिक वितरण व स्नेहसंमेलन संपन्न झाले . कार्यक्रमाचे अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना वैशाली जोशी पुढे म्हणाल्या की अकोल्यात ज्ञानवर्धिनी प्राथमिक शाळा ही सर्वच समाज घटकातील प्रत्येक विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासाकडे वैयक्तीक लक्ष दिले जाते . लेखन वाचन अंकगणित मराठी इंग्रजी बरोबरच विविध कला व क्रीडा गुणांकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले जाते म्हणूनच विविध क्षेत्रात विद्यार्थी यश संपादन करीत आहेत .स्थानिक मान्यवरांचे या शाळेस नेहमीच अर्थिक सहकार्य मिळत आहे . या कार्यकमाचे प्रमुख अतिथी म्हणून आमदार डॉ. किरण लहामटे उपस्थित होते.

# सर्व समाज एकोप्याने राहावा हेच माझ्या कीर्तनाचे रहस्य

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**



नायगाव तालुक्यातील मौजे कोकलेगाव व राजगड नगर येथील श्री संत सद्गुरू गंगागीर उर्फ भंडारी महाराज यांची 85 वी पुण्यतिथी निमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी समस्त गावकऱ्यांच्या वतीने प्रशस्त जागेमध्ये असलेल्या श्री गंगागीर महाराज येथील मठ संस्थानात अभिषेक भजन व आरती आणि श्री ह भ प गुरुवर्य मधुसूदन महाराज कापशीकर यांच्या समदूर वाणीतून कीर्तनरुपी सेवा झाली असून या धार्मिक कार्यक्रमाचा कोकलेगाव राजगड नगर व परिसरातील भाविकांनी लाभ घेतला आहे.

प्रत्येक गावाचं एक आगळं वेगळं वैशिष्ट्य असते कोण्या गावात संत जन्मा येतो तर कोण्या गावात समाज सुधारक क्रांतिवीर जन्मा येतात त्या गावच्या मातीचे भाग्य असतं की तेथील माती पावन झालेली असते मौजे कोकलेगाव व राजगड नगर येथे श्री सद्गुरु गंगागीर उर्फ भंडारी महाराज या महान संताचा जन्म झाला असून त्यांच्या कार्याला उजाळा देण्यासाठी समस्त गावकऱ्यांच्या वतीने गेल्या 85 वर्षापासून अखंडपणे धार्मिक सेवा चालू आहे या पुण्यस्मरण दिनानिमित्त कोकलेगाव राजगड नगर येथील प्रत्येक घरातील बाईलेकी आपल्या सासर येथून माहेरी हमखास येतात तर परिसरातील भाविक देखील आवर्जून उपस्थित राहतात या पुण्यतिथीनिमित्त भरगच्च जत्रा भरली जाते हा आनंदी सोहळा सर्वांना द्विगणित करणारा असतो दिनांक 15 जानेवारी रोजी सायंकाळी हरिभक्त परायण ओमकार महाराज आळंदीकर यांचे हरी जागर कीर्तनाची सेवा झाली तर दिनांक 16 जानेवारी रोजी सकाळी काल्याच्या कीर्तनात हभप गुरुवर्य मधुसूदन महाराज कापशीकर यांनी कंठे धरीला कृष्ण मनी,अवघा जनी प्रकाश.. जगतगुरु संत तुकोबाराय यांच्या या अभंगाच्या आधारित सर्व समाज एकोप्याने राहणे हे माझ्या कीर्तनाचे रहस्य आहे असे अनमोल विचार त्यांनी भाविकांना दिली आहे.

अखंडितपणे चालणाऱ्या श्री सद्गुरु गंगागीर महाराज पुण्यतिथी सोहळा या कार्यक्रमास कोकलेगाव राजगड नगर येथील ग्रामस्थांचे योगदान फार महत्त्वाचे ठरले असून त्यांच्या परिश्रमामुळेच ही सेवा दरवर्षी चालू आहे या सोहळ्याला कोकलेगाव राजगड नगर यासह परिसरातील भाविक भक्तांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# आव्हाड महाविद्यालयाच्या खेळाडूंचे वेटलिफ्टिंगमध्ये यश

- राष्ट्रीय स्तरावर उमटवला ठसा

**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**










येथील पार्थ विद्या प्रसारक मंडळाच्या बाबुजी आव्हाड महाविद्यालयातील खेळाडूंनी विविध राष्ट्रीय व आंतरविद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धांमध्ये आपल्या कौशल्याची चुणूक दाखवत नेत्रदीपक यश संपादन केले आहे. भोपाळ, मोदीनगर आणि अमरावती येथे झालेल्या विविध स्पर्धांमध्ये महाविद्यालयाच्या खेळाडूंनी पदकांची लयलूट केली असून त्यांची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे

आंतरविद्यापीठ स्पर्धेत रौप्य पदके:संजीव अग्रवाल ग्लोबल युनिव्हर्सिटी, भोपाळ येथे झालेल्या 'दक्षिण-पश्चिम विभागीय अखिल भारतीय आंतरविद्यापीठ' स्पर्धेत महाविद्यालयाच्या योगिता खेडकर हिने ८७ किलो गटात १९५ किलो वजन उचलून रौप्य पदक पटकावले. तसेच पांडुरंग गायकवाड याने ७९ किलो गटात २९५ किलो वजन उचलून रौप्य पदक मिळवले. या दोघांचीही चंदीगड येथे होणाऱ्या अखिल भारतीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

खेलो इंडियामध्ये पुनम काकडेचे यश:मोदीनगर (उत्तर प्रदेश) येथील 'राष्ट्रीय अस्मिता खेलो इंडिया वुमेन्स वेटलिफ्टिंग लीग' मध्ये पुनम काकडे हिने ६९ किलो गटात १६५ किलो वजन उचलून युथ वयोगटात रौप्य आणि सिनियर गटात कांस्य पदक पटकावत दुहेरी यश मिळवले.

दीपक वाघला सुवर्ण पदक: अमरावती येथे झालेल्या पहिल्या 'राष्ट्रीय खेलो इंडिया ट्रायबल गेम्स' राज्य निवड चाचणीत दीपक वाघ याने ६० किलो गटात २०० किलो वजन उचलून सुवर्ण पदक जिंकले. त्याची पहिल्या राष्ट्रीय खेलो इंडिया ट्रायबल गेम्ससाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष अभय आव्हाड, उपाध्यक्ष ॲड. सुरेशराव आव्हाड, प्राचार्य डॉ. बबन चौरे तसेच अहिल्यानगर डिस्ट्रिक्ट वेटलिफ्टिंग असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. सुभाष देशमुख, उपाध्यक्ष राजेंद्र सोनवणे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. या खेळाडूंना असोसिएशनचे सचिव व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. डॉ. विजय देशमुख व प्रा. सचिन शिरसाट यांचे मार्गदर्शन लाभले.

## भंडारदरा परिसर 'डेथ मिस्टरी' कडे?

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

भंडारदरा धरण परिसरात निसर्गसौंदर्याचा आनंद घेण्यासाठी वर्षभर पर्यटकांची मोठी गर्दी असते. मात्र, याच गर्दीचा फायदा घेऊन या भागात गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ होत असल्याची गंभीर बाब समोर येत आहे. गेल्या दोन वर्षांत या परिसरात चार अनोळखी मृतदेह आढळले होते. त्यात एक तरुणी व तीन पुरुषांचा समावेश होता. या सर्व मृत्यूंचे गूढ अद्याप उकललेले नाही. अशातच नववर्षाच्या पूर्वसंध्येला भंडारदरा धरणाच्या पायथ्याशी कुजलेल्या अवस्थेत आणखी एका तरुणीचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे.या पाचही प्रकरणांमध्ये मृतांची ओळख पटू शकलेली नाही. त्यामुळे भंडारदरा धरण परिसर हळूहळू 'टुरिस्ट स्पॉट डेथ मिस्टरी' म्हणून ओळखला जाऊ लागल्याची भीती व्यक्त होत आहे.




ठाणे : दिवा प्रभाग क्र २८ मधील दर्शना चरणदास म्हात्रे, दीपक जाधव, शहरप्रमुख रमाकांत मढवी व दिव्यातील सर्वात कमी वयाची असलेली उमेदवार साक्षी रमाकांत मढवी यांना देखील मतदारांनी मोठा कौल देऊन विजयी केले आहे. प्रभाग क्र २९ मधील शिवसेनेचे बाबाजी पाटील व अर्चना प्रविण (निलेश) पाटील व भाजपच्या वेदिका साहिल पाटील देखील मोठ्या मताधिक्याने निवडून आल्या आहेत. प्रसंगी दिव्यात मोठ्या थाटात व उत्साहात सर्व नगरसेवकांचा आनंद उत्सव साजरा करण्यात आला तर राजकारणातील शिवसेना भाजप महायुतीचा हा ऐतिहासिक विजय असल्याचे माजी उपमहापौर रमाकांत मढवी यांनी स्पष्ट केले. ( फोटो - संतोष पडवळ )

# वनकुटे-ब्राम्हणवाडा रस्त्यावरील निकृष्ट कामामुळे अपघात

**वनकुटे: (समर्थ गांवकरी)**

वनकुटे-ब्राम्हणवाडा रस्त्यावर सुरू असलेल्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे तसेच रस्त्यावरील अर्धवट व धोकादायक पुलाच्या अवस्थेमुळे दिनांक ११ जानेवारी रोजी मोटारसायकल अपघात होऊन दोन जण जखमी झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात बबन साहेबराव मधे व अनिल साहेबराव मधे (रा. वनकुटे) हे जखमी झाले आहेत. सदर अपघात हा खंडोबा मंदिराच्या पाठीमागील रस्त्यावर घडला. या रस्त्याचे काम निकृष्ट पद्धतीने सुरू असून, सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक असलेले कोणतेही सावधानतेचे फलक किंवा इशारे सुरुवातीला लावण्यात आले नव्हते. त्यामुळे वाहनचालकांसाठी हा रस्ता धोकादायक ठरत आहे. वनकुटे गावचे सरपंच पोपट हांडे यांनी या निकृष्ट कामाबाबत वेळोवेळी संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्याचे सांगितले. तसेच माजी जिल्हा परिषद सदस्य बाजीराव दराडे यांनीही यासंदर्भात वारंवार लेखी व तोंडी तक्रारी केल्या आहेत. मात्र, प्रशासनाकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. विशेष म्हणजे, अपघातग्रस्त ठिकाणी अनेकदा सूचना दिल्यानंतरही तीन दिवसांनीच कामाचा सूचनाफलक लावण्यात आल्याचे सरपंचांनी स्पष्ट केले. तोपर्यंत अपघात घडून नागरिक जखमी झाले. सध्या अकोले तालुक्यात निकृष्ट दर्जाच्या रस्ते कामांचा मुद्दा चांगलाच गाजत आहे. अशा परिस्थितीत या रस्त्यावर भविष्यात जीवितहानी झाल्यास जबाबदारी कोणाची? निकृष्ट काम करणाऱ्या कॉन्ट्रॅक्टरवर कारवाई होणार का?

# दादापाटील राजळे महाविद्यालयात राष्ट्रीय युवा दिन साजरा

**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**




दादापाटील राजळे कला व विज्ञान महाविद्यालय येथे राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला. या निमित्ताने स्वामी विवेकानंद जयंती, राजमाता जिजाऊ जयंती, कृषी क्रांतीचे सेनानी डॉ. आण्णासाहेब शिंदे यांचे पुण्यस्मरण , स्वातंत्र्य सैनिक सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांची जयंती व महाविद्यालयाचे दिनदर्शिका २०२६ प्रकाशन कार्यक्रम इ. कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून कासारपिंपळगावच्या सरपंच सौ. मोनालीताई राहूल राजळे या उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान वृद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन रामकिसन काकडे यांनी भूषविले.

कार्यक्रमासाठी वृद्धेश्वर सहकारी साखर कारखाना चे कार्यकारी संचालक नितीन शिंदे, कासारपिंपळगावचे ग्रामसेवक प्रमोद म्हस्के, आप्पासाहेब राजळे हे उपस्थित होते.याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजधर टेमकर यांनी आपल्या प्रास्ताविकेतून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जडणघडणीमध्ये आई जिजाऊंची भुमिका तसेच युवकांसाठी प्रेरणादायी असलेले स्वामी विवेकानंद, स्वातंत्र्य सैनिक, सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांचा सहकार क्षेत्रातील असलेला महत्वाचा वाटा व डॉ. अण्णासाहेब शिंदे यांनी स्व. दादापाटील राजळे यांना शिक्षण संस्था उभी करण्यासाठी केलेली मदत याविषयी माहिती दिली.

करियर कट्टा उपक्रमा अंतर्गत सेंटर ऑफ एक्सलन्स म्हणून महाविद्यालयाचा गौरव झाल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजधर टेमकर यांचा सन्मान करण्यात आला. महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या वतीने बारामती येथे करिअर संसद व स्वयंसिध्दा या कार्यक्रमासाठी कु. भोसले वृषाली, कु. तुपे धनश्री, आठरे अनिकेत, कु. स्नेहल नेहुल, कु.भक्ती सरगड, कु.दिया पठाण, अक्षय आव्हाड यांचा तसेच फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम मध्ये सहभागी झालेले डॉ. आसाराम देसाई व प्रा. पानसरे चंद्रकांत यांचा सन्मान करण्यात आला. त्यांनी त्या ठिकाणचे अनुभव विद्यार्थ्यांना सांगितले.

महाविद्यालयामधील डॉ. एस जे देशमुख, डॉ. एस आर भराटे, डॉ. एस. बी. देशमुख या प्राध्यापकांना वर्ल्ड कॉन्स्टिट्यूशन अँड पार्लिमेंट असोसिएशन यांच्या कडून आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला त्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष रामकिसन काकडे यांनी वृद्धेश्वर सहकारी साखर कारखानाची जडणघडण व वाढलेली क्षमता यावर टिप्पणी केली. एन. एस. एस चे कार्यक्रमाधिकारी डॉ. आसाराम देसाई यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापिका दुर्गा भराट यांनी केले. या कार्यक्रमासाठी प्रा. महेश गोरे, प्रा. योगिता इंगळे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे अंतर्गत गुणवत्ता आश्वासन कक्ष चे समन्वयक डॉ. आर. टी. घोलप, महाविद्यालयाचे कला शाखाप्रमुख डॉ. महेबुब तांबोळी, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# वादविवाद व गटचर्चा स्पर्धेचे बक्षीस वितरण संपन्न

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर तालुका शिवनेर शिक्षण प्रसारक मंडळाचे श्री शिव छत्रपती महाविद्यालय जुन्नर जिल्हा पुणे अंतर्गत दिनांक 13/1/2026 रोजी कै.इंदिराबाई जोगळेकर वादविवाद व गटचर्चा स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभ व उत्कृष्ट वक्ता निवड नुकतीच पार पडली. या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे विश्वस्त श्री अनिलकाका जोगळेकर होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.बी.वाघमारे व अध्यक्ष प्रतिनिधी प्रा.व्ही. बी.कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ.आर. डी.चौधरी,समन्वयक व उपप्राचार्या प्रा.पी.एस.लोढा,पर्यवेक्षक प्रा. एस.ए.श्रीमंते,कार्यालयीन प्रबंधक सौ.एम.डी.कोरे,एमसीव्हीसी विभाग प्रमुख प्रा.के.जी.नेटके,वरिष्ठ वक्तृत्व मंडळाचे चेअरमन प्रा. डॉ.वंदना नढे व ज्युनिअर वक्तृत्व



मंडळाचे चेअरमन प्रा.एस.डी. सोनार तसेच वक्तृत्व मंडळातील सर्व प्राध्यापक प्राध्यापिका उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे संस्थेचे विश्वस्त श्री अनिलकाका जोगळेकर यांनी या स्पर्धेतून विद्यार्थ्यांनी स्वप्न पहावी व ती स्वप्न साकार व्हावी या दृष्टिकोनातून प्रयत्न करावा. मी ही स्पर्धा यशस्वीरित्या पूर्ण व्हावी असे स्वप्न पाहिले होते व ही स्पर्धा गेली 49 वर्ष अत्यंत जोमाने अखंडपणे यशस्वीरित्या चालू आहे. ही स्पर्धा पुढील वर्षी 50 व्या वर्षात पदार्पण करेल. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम. बी.वाघमारे यांनी या स्पर्धेतून जी वक्तृत्वाची संधी मिळते त्या संधीचं सोनं करावे.वक्तृत्वासाठी ही स्पर्धा अत्यंत उत्कृष्ट व्यासपीठ आहे यातून अनेक वक्ते तयार झाले आहेत आणि ते उच्च स्तरावर कार्यरत आहेत ही महाविद्यालयाची अभिमानास्पद बाब आहे अशी भावना आपल्या मनोगतातून व्यक्त केली.

संस्थेचे अध्यक्ष ॲड.संजय शिवाजीराव काळे यांनी या स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या या.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. एस.डी.सोनार यांनी केले,तर पाहुण्यांचा परिचय प्रा.आर.व्ही. गायकवाड यांनी केले.

दिनांक 27 /12 /2015 रोजी कै.इंदिराबाई जोगळेकर वादविवाद व गटचर्चा स्पर्धेतील विजेत्यांचे बक्षीस वितरण कार्यक्रम मान्यवरांच्या हस्ते पार पडला.

ज्युनिअर विभाग स्पर्धेतील प्रथम तीन क्रमांक खालील गटांनी पटकावले प्रथम क्रमांक अकरावी विज्ञान स्वामी विवेकानंद ग्रुप,द्वितीय क्रमांक अकरावी विज्ञान मॉर्डन युथ ग्रुप, तृतीय क्रमांक अकरावी कॉमर्स आम्ही श्री शिव छत्रपती महाविद्यालयाचे चॅम्पियन,तसेच वरिष्ठ विभागातील पुढील विद्यार्थ्यांनी प्रथम तीन क्रमांक पटकावले.प्रथम क्रमांक- अल्फिया नजीर पठाण आणि नम्रता रवींद्र सोनवणे, द्वितीय क्रमांक- संतोषी संतोष कामटकर आणि आदित्य दिलीप कुमकर,तृतीय क्रमांक -मयुरी दिपक खरात आणि निकिता प्रवीण डोके.उत्कृष्ट वक्ता स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांचा भरभरून प्रतिसाद मिळाला.

महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला या स्पर्धेसाठी ज्युनिअर विभाग स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा.जी.एम. रोकडे व प्रा.आर.ए. मोरे,प्रा. एस.जी.भोर यांनी काम पाहिले तसेच वरिष्ठ विभागाच्या स्पर्धेचे परीक्षक प्रा.वाय.सी.गिरमे,प्रा. पी.एस. उतळे,प्रा.आर.बी. जोशी यांनी काम पाहिले.

# महानगर पालीका निवडणुकी भाजपाचे विजयी नगरसेवकांचा किनवटमध्ये जल्लोष

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

दि. १६ : राज्यात नुकत्याच पार पडलेल्या महानगरपालिका निवडणुकांच्या मतमोजणीनंतर जाहीर झालेल्या निकालात भारतीय जनता पक्ष हा राज्यातील क्रमांक एकचा पक्ष ठरल्याने किनवट शहरात भाजपाच्या वतीने जल्लोष साजरा करण्यात आला. किनवट शहर मंडळाचे अध्यक्ष स्वागत आयनेनीवार यांच्या नेतृत्वाखाली शहरातील जिजामाता चौकात फटाके फोडून व लाडू वाटप करून हा आनंदोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. हा जल्लोष आमदार भीमराव केराम तसेच जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. यावेळी भाजपाच्या कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह पाहावयास मिळाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर तर



राज्यातील जनतेने विकास, सुशासन करिता प्रसिध्द असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केल्याचे यावेळी कार्यकर्त्यांकडून सांगण्यात आले.

या प्रसंगी माजी नगराध्यक्ष व्यंकटराव नेम्मानीवार, भाजपा गटनेते श्रीनिवास नेम्मानीवार यांच्यासह बाळकृष्ण कदम, सुनील मच्छेवार, विश्वास कोल्हारीकर, सतीश बिराजदार, नगरसेवक संतोष मरस्कोल्हे, जयराज वर्मा, माजी नगरसेवक शिवा आंधळे, गौरव इटकेपेल्लीवार, राजेंद्र भातनासे, राहुल दरगुलवार, जगदीश तिरमनवार, प्रमोद पहुरकर, सागर पिसारीवार, सुरेश साकपेल्लीवार, सुगत नगराळे, संतोष कनाके, पुनमताई दीक्षित, शेख खलील, मनोहर ताटे, हौसाजी काकडे, विमर्ष पाटील आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आपला नाकर्तेपणा झाकण्यासाठी पालकमंत्र्यांवर आरोप : आ. दाते सर

**पारनेर: (समर्थ गांवकरी)**

पारनेर शहराची पाणीपुरवठा योजना पालकमंत्र्यांनी अडवली असल्याचा आरोप हा स्वतःचा नाकर्तेपणा झाकण्याचा केविलवाणा प्रयत्न असुन पारनेर शहराच्या पाणीपुरवठा योजनेबाबत पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटीलांनी योजना अडवली असल्याचे खोटे आरोप केले जात असून, हा प्रकार म्हणजे स्वतःच्या नाकर्तेपणावर पडदा टाकण्यासाठी केलेला केविलवाणा आणि दिशाभूल करणारा प्रयत्न असल्याचे आ. काशिनाथ दाते यांनी केले. प्रत्यक्षात आमदार काशिनाथ दाते यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे पारनेर शहरासाठी मागिल एक वर्षात १८ कोटी ७१ लक्ष रुपयांचा विकासनिधी उपलब्ध झाला असून, या सर्व कामांना पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील साहेब यांची मोलाची



साथ व सहकार्य लाभलेले आहे.

विकासकामांना निधी उपलब्ध करून देताना पालकमंत्र्यांनी कधीही दुजाभाव केला नाही, ही वस्तुस्थिती जनतेला माहीत आहे.

पारनेर शहराचा विकास करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी विशेष मदत केली असल्याचेही आ. दाते यांनी सांगितले.

दुर्दैवाने आमदार दाते यांच्या माध्यमातून शहरासाठी मंजूर झालेली अनेक विकासकामे पारनेर नगरपंचायतमधील सत्ताधारी मंडळींनी राजकीय द्वेषापोटी अडवून ठेवली आहेत. यामुळेच पारनेर शहराच्या विकासाला मोठी खीळ बसलेली असून, त्याची जबाबदारी दुसऱ्यांवर ढकलण्याचा हा केवळ निष्फळ प्रयत्न आहे. आज पारनेर नगरपंचायतमधील सत्ताधाऱ्यांचे नेतृत्व हे आमदारपद भूषवून, तसेच राज्यात सत्तेत असतानाही त्यांनी पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्यासाठी नेमके कोणते ठोस प्रयत्न केले, हा प्रश्न जनतेला पडलेला आहे.

> पारनेर शहराला पाणी आणल्याशिवाय पारनेर शहरात पाय ठेवणार नाही आणि मतही मागायला येणार नाही, सत्ता असूनही जर मूलभूत गरज असलेली पाणी योजना पूर्ण करता आली नसेल, तर त्याची जबाबदारी स्वीकारण्याऐवजी इतरांवर आरोप करणे हे राजकीय अपरिपक्वतेचे द्योतक आहे.
>
> **- वसंतराव चेडे, माजी जिल्हा परिषद सदस्य पारनेर**
>
> पारनेर शहराचा विकास हा आमदार दाते यांचा प्रामाणिक ध्यास असून, राजकारणापेक्षा शहराच्या हिताला प्राधान्य देऊन ते सातत्याने काम करत आहेत. विकासकामांना अडथळे आणणाऱ्यांनी आत्मपरीक्षण करावे आणि पारनेरच्या जनतेची दिशाभूल थांबवावी,
>
> **- पै. युवराज पठारे, नगरसेवक नगरपंचायत पारनेर**

# नांदेडकरांचा कौल विकास, सकारात्मकता व स्थैर्याला : अशोकराव चव्हाण!

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला मिळालेल्या स्पष्ट व ऐतिहासिक बहुमताबद्दल खासदार अशोकराव चव्हाण यांनी नांदेडकरांचे मनापासून आभार मानले आहेत. हा विजय केवळ एका पक्षाचा नसून नांदेडकरांनी दाखवलेल्या विश्वासाचा, अपेक्षांचा आणि विकासाभिमुख विचारांचा विजय असल्याचे त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले.

खा. अशोकराव चव्हाण म्हणाले की, नांदेडच्या सुज्ञ मतदारांनी विकास, पारदर्शकता आणि सकारात्मक राजकारणाला कौल दिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सक्षम, दूरदृष्टीपूर्ण व लोकाभिमुख नेतृत्वावर नांदेडकरांनी पुन्हा एकदा विश्वास व्यक्त केला असून याच्या नेतृत्वाखाली देश व राज्य योग्य



दिशेने प्रगती करत असल्याचे जनतेने अधोरेखित केले आहे.

या विजयामागे भाजपच्या प्रत्येक कार्यकर्त्याची मेहनत, त्याग आणि प्रामाणिक प्रयत्न कारणीभूत असल्याचे नमूद करताना त्यांनी सांगितले की, पक्षाचे सर्व नेते, पदाधिकारी, बूथस्तरीय कार्यकर्ते आणि उमेदवारांनी एकजुटीने, शिस्तबद्ध आणि सकारात्मक प्रचार केला. त्यामुळे भाजपला स्पष्ट बहुमत मिळाले आहे.

विरोधकांवर टीका करताना खा. चव्हाण म्हणाले की, विरोधकांकडे जनतेसमोर मांडण्यासाठी कोणताही ठोस विकासात्मक मुद्दा नव्हता. संपूर्ण प्रचार काळात त्यांनी केवळ शिव्याशाप, आरोप-प्रत्यारोप, अपप्रचार आणि नकारात्मकतेचा अवलंब केला. मात्र नांदेडकरांनी अशा नकारात्मक राजकारणाला ठाम नकार दिला असून भाजपा च्या विकास आणि सकारात्मकतेचीच निवड केली आहे.

मतदारांना नकारात्मकता, द्वेष आणि दिशाहीन राजकारण कधीच आवडत नाही, हे या निकालातून पुन्हा एकदा सिद्ध करूण देऊ भाजपाचे नांदेड वाघाळा महानगर पालीकेत ४५ नगरसेवक निवडुन देऊन सपष्ट बहुमत देऊन विरोधकांचा पूर्णपणे पराभव झाला असून ते भुईसपाट झाल्याचे चित्र स्पष्टपणे दिसत असल्याचे त्यांनी सांगितले.

आपल्यावर नांदेडकरांनी कायम विश्वास ठेवलेल्या प्रेमाबद्दल आणि विश्वासाबद्दल आपल्या भावना व्यक्त करताना खासदार अशोकराव चव्हाण म्हणाले की, नांदेडच्या जनतेने माझ्यावर ज्या प्रकारे विश्वास दाखवला, प्रेम दिले आणि सहकार्य केले, त्याबद्दल मी सदैव ऋणी आहे. नांदेडच्या सर्वांगीण विकासासाठी, शहर व ग्रामीण भागातील प्रश्न सोडवण्यासाठी आणि जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी माझ्यासह सर्व नगरसेवक सातत्याने प्रयत्नशील राहून सर्वांचे लोकहीता साठी अधिका अधिक कामे करतील अशी ग्वाहीही त्यांनी दिली आहे .

# डॉ. निलेश काळे यांच्या भूगोल विषयावरील पुस्तकाचे थाटात प्रकाशन

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे,अण्णासाहेब वाघिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, ओतूर येथील भूगोल विभागातील प्राध्यापक डॉ.निलेश काळे यांच्या भारत व महाराष्ट्राचा प्राकृतिक भूगोल या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले या प्रकाशन सोहळ्यास संस्थेचे खजिनदार ॲड. मोहनराव देशमुख, सहाय्यक सहसचिव (प्रशासन)ए. एम.जाधव, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रमेश शिरसाट, उपप्राचार्य डॉ.कल्याण सोनावणे तसेच भूगोल विभाग प्रमुख प्रा.डॉ.ए.टी.पाडवी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.पुस्तकाचे औपचारिक प्रकाशन ए.एम.जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी मनोगत व्यक्त करताना त्यांनी डॉ.निलेश काळे यांच्या शैक्षणिक कार्याचा विशेष उल्लेख करून त्यांच्या अभ्यासपूर्ण लेखनाचे



मनःपूर्वक कौतुक केले. डॉ.काळे यांनी दीर्घ अध्यापन अनुभवाच्या आधारे हे पुस्तक सिद्ध केले असून विद्यार्थ्यांच्या गरजा,समज आणि स्पर्धात्मक परीक्षांचा विचार करून विषयाची मांडणी करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

सदर पुस्तक नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार तयार करण्यात आले असून अभ्यास क्रमाशी सुसंगत,संकल्पनात्मक स्पष्टता देणारे व उदाहरणाधिष्ठित विवेचन यात करण्यात आले आहे. भूगोल विषयातील मूलभूत संकल्पना, आधुनिक दृष्टीकोन, नकाशा व आकृती आधारित समज, तसेच अभ्यासासाठी उपयुक्त संदर्भांचा समावेश असल्याने हे पुस्तक पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी निश्चितच मार्गदर्शक ठरणार आहे.या प्रसंगी प्राचार्य डॉ.रमेश शिरसाट यांनी महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद हा सातत्याने संशोधन व लेखनात सक्रिय असल्याचे सांगून, डॉ.काळे यांच्या या उपक्रमातून प्राध्यापकां नाही शैक्षणिक लेखन व संदर्भग्रंथ निर्मितीस प्रेरणा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच विद्यार्थ्यांना दर्जेदार अध्ययन साहित्य उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने असे प्रयत्न अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

भगोल विभागप्रमुख डॉ. ए. टी. पाडवी यांनी विभागाच्या वतीने डॉ. काळे यांचे अभिनंदन करून, हे पुस्तक अध्यापन-अध्ययन प्रक्रियेला अधिक समृद्ध करेल, असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमा दरम्यान उपस्थित मान्यवरांनीही डॉ.काळे यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.या यशस्वी कार्यक्रमाच्या आयोजनासाठी डॉ. रमेश गोपाळे व प्रा. अंकुश मोध्ये यांनी विशेष परिश्रम घेतले. प्राध्यापक, विद्यार्थी व कर्मचारी यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला.

# बालवयापासूनच संविधानाची मूल्ये अंगीकृत करा

**(समर्थ गांवकरी)**

सध्या सर्व शासकीय पातळीवरून भारतभर संविधान अमृत महोत्सव साजरा होतोय . त्यानुसार घर घर संविधान कार्यक्रमातून तसेच शालेय विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्व त्यातील आशय विषय समजावेत म्हणून ज्ञानवर्धिनी शाळेत - अकोले एकल महिला समितीच्या अध्यक्षा प्रतिमा कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला .

विद्यार्थ्यांशी बोलतांना प्रतिमा कुलकर्णी म्हणाल्या की विविध रंगीबेरंगी फुले एकाच धाग्यात गुंफले की अतिशय सुंदर हार तयार होतो त्याचप्रमाणे आपण सारे विविध धर्म जाती वेशभुषा बोलीभाषा सण उत्सव परंपरा भिन्न असूनही संविधानाच्या एकाच धाग्यात गुंफलो असल्याने भारतीय या नात्याने जोडले गेलो आहोत .

# 'अरुणोदय' सिकलसेल विशेष मोहीम

**■ भोकर शहरात मोफत तपासणी**

**भोकर : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने सिकलसेल आजाराचे प्रमाण अधिक असलेल्या २१ जिल्ह्यांत १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ दरम्यान 'अरुणोदय' सिकलसेल विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत भोकर शहरातील एकही नागरिक सिकलसेल तपासणीपासून वंचित राहू नये, यासाठी व्यापक नियोजन करण्यात आले आहे.

ही मोहीम जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख व निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. राजाभाऊ बुट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविली जात आहे.भोकर



ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रताप चव्हाण व आरोग्य निरीक्षक सत्यजीत टिप्रेसवार यांच्या नेतृत्वाखाली शहरात घराघरांत सर्वेक्षण व मोफत तपासणी सुरू आहे. हे सर्वेक्षण आरोग्य सेविका, कर्मचारी तसेच अंगणवाडी सेविकांच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

सिकलसेल हा अनुवंशिक रक्तविकार असून वेळेवर तपासणी व योग्य उपचाराने तो नियंत्रणात ठेवता येतो. त्यामुळे भोकर शहरातील सर्व नागरिकांनी सिकलसेल तपासणी करून घ्यावी, असे आवाहन डॉ. प्रताप चव्हाण यांनी केले आहे.अधिक माहितीसाठी आरोग्य विभागाच्या १०४ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन केले .

# डॉ. दिलीप पुंडे यांना राष्ट्रपती भवनाचे मानाचे निमंत्रण

**मुखेड : (समर्थ गांवकरी)**

ग्रामीण व मागास भागात शेतकरी–शेतमजुरांचे प्राण वाचविण्यासाठी अखंड ३८ वर्षे सेवेत असलेल्या सर्पदंश उपचार क्षेत्रातील अग्रगण्य तज्ज्ञ डॉ. दिलीप पांडुरंगराव पुंडे यांच्या कार्याची राष्ट्रपती भवनाने गौरवपूर्ण दखल घेतली आहे. प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रपती भवन, नवी दिल्ली येथे होणाऱ्या 'रिसेप्शन ॲट होम' या मानाच्या समारंभासाठी त्यांना विशेष निमंत्रण देण्यात आले आहे. देशभरातून केवळ ११ डॉक्टरांची निवड करण्यात आली असून, ग्रामीण भारतातील सर्पदंशाविरुद्धच्या दीर्घकालीन व परिणामकारक लढ्याची ही राष्ट्रीय पातळीवरील मान्यता मानली जात आहे. डॉ. पुंडे यांनी १९८८ पासून मुखेड व परिसरात सर्पदंश उपचारात क्रांतिकारी



बदल घडवून आणले. पूर्वी सुमारे २५ टक्के असलेला सर्पदंशामुळे होणारा मृत्यूदर त्यांनी वैज्ञानिक उपचारपद्धती, तातडीची वैद्यकीय सेवा व सातत्यपूर्ण जनजागृतीच्या माध्यमातून शून्य टक्क्यांपर्यंत आणला. आजवर त्यांनी १० हजारांहून अधिक सर्पदंशग्रस्त रुग्णांचे प्राण वाचवले आहेत.

# चौथे युगस्त्री फातिमाबी शेख मुस्लिम मराठी साहित्य संमेलन संपन्न

**(समर्थ गांवकरी)**

ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य संस्था महाराष्ट्र शाखा अहिल्यानगर आयोजित चौथे युगस्त्री फातेमाबी शेख मुस्लिम मराठी साहित्य संमेलन कवयित्री मेहमूदा रसूल शेख यांच्या अध्यक्षतेखाली श्रीरामपूर जिल्हा अहिल्यानगर येथे थाटात संपन्न झाले.यावेळी बोलताना संमेलनाचे उद्घाटक डॉक्टर श्रीपाल सबनीस म्हणाले की सावित्रीबाईच्या पत्रामध्ये असणारा फातिमाबी शेख यांचा उल्लेख त्यांचं अस्तित्व असणारा महत्त्वाचा पुरावा असल्याचा उल्लेख करून फातिमाबी शेख यांचे काळजातले स्थान कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. आज त्यांच्या नावाने साहित्यिक सोहळे साजरे होत आहेत.मुस्लिम मराठी स्त्री साहित्यिक मोठ्या प्रमाणात लिहीत



आहेत.हा मराठी सांस्कृतिक संचिताचा गौरव आहे.कार्यक्रमाचे प्रास्ताविक खाजाभाई बागवान व संस्थापक शफी बोल्डेकर यांनी केले . याच कार्यक्रमात स्पंदन स्मरणिका,' युगस्त्री फातिमाबी शेख ' प्रातिनिधीक काव्यसंग्रह संपादन अनिसा सिकंदर शेख , तसेच त्यांचाच काव्यसप्तक हा काव्यसंग्रह, काळ काळांत, व अहमदनगर साहित्यिक सूची शब्बीर बिलाल, 'शेवटी सोबत काहीच येत नाही ' नसीम जमादार,खाजाभाई बागवान लिखीत " सांस्कृतिक सावल्या समिक्षा ग्रंथ या ग्रंथाचे प्रकाशन डॉक्टर श्रीपाल सबनीस यांच्या शुभहस्ते करण्यात आले. फातिमाबी शेख साहित्यरत्न पुरस्कार सायराबानो चौगुले यांना तर ॲड .सिकंदर लतीफ शेख यांच्या स्मरणार्थ समाजभूषण पुरस्कार शहाजान शेख व मुख्याध्यापक हुसेनसाब बागवान यांच्या स्मरणार्थ आदर्श शिक्षक पुरस्कार निलोफर फणिबंद यांना प्रदान करण्यात आला.जयंती निमित्त फातीमाबी शेखवर स्पर्धा घेण्यात आल्या ते बक्षीस पात्र यशवंत हिराबाई पगारे , कृष्णा अविनाश क्षीरसागर,ज्योत्स्ना डासाळकर, दादासाहेब शेख यांचा सन्मान करण्यात आला तसेच 'इख्लास रमजान' अंकातील उत्कृष्ट कविता बा.ह मगदूम ,सुमैय्या चौधरी,आलिया गोहर यांना सन्मानित करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थापक शफी बोल्डेकर , संस्थाध्यक्ष हाशम पटेल , संस्था सचिव डॉक्टर सय्यद जब्बार पटेल, प्राचार्य इ.जा. तांबोळी ,गझलकार बा. ह. मगदूम, प्रा . सय्यद अल्लाउद्दीन आदि मान्यवर साहित्यिक उपस्थित होते. वर्तमान चिंतन मांडताना हिंदू मुस्लिम भाईचारा कुठे हरवला या विषयीचे चिंतन करताना आमची हिंदू मुस्लिम संत साहित्य परंपरा जपण्याची गरज असल्याचे प्रतिपादन संमेलनाध्यक्षा मेहमूदा शेख यांनी केले.यावेळी प्रा. डॉ. राहुल हांडे यांनी फातिमाबी शेख यांच्या विषयी आपले विचार मांडून त्यांचे अस्तित्व सिद्ध केले. फातिमाबीची जयंती शाळा कॉलेजात ,सरकारी निमसरकारी दप्तरात साजरी व्हावी , फातिमा शेख च्या नावे विद्यापीठ होण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे असे फातिमाबी शेख प्रातिनिधिक काव्य संग्रहाच्या संपादिका अनिसा सिकंदर आपल्या मनोगतात म्हणाल्या. दुपार सत्रात कवी संमेलनाध्यक्ष नुरजहाँ शेख यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलन यशस्वी संपन्न झाले .कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य संस्था सर्व पदाधिकारी अहिल्यानगर जिल्हा अध्यक्ष दिलशाद सय्यद ,स्वागताध्यक्ष डॉक्टर सलीम सिकंदर शेख, रज्जाक शेख , केंद्रिय सहसचिव अनिसा सिकंदर शेख , केंद्रिय उपाध्यक्ष खाजाभाई बागवान , शबाना तांबोळी,बेन्जीर शेख यांनी विशेष प्रयत्न केले.